प्रकरण तिसरे -

## बालकवी आणि सुमित्रानंदन पंत यांच्या निसर्गकवितेत

## आढळणाऱ्या समान-असमानवृत्ती

## प्रकरण तिसरे

## बालकवी आणि सुमित्रानंदन पंत यांच्या निसर्गकवितेत आढळणाऱ्या समान-असमानवृत्ती

कवींना प्रतिभेची जन्मदत्त देणगी प्राप्त झालेली असते. मानवी-जीवनातील काही साधक बाधक कारणांनी या प्रतिभेला अभिव्यक्त होण्यास संधी मिळत असते. बालकवी व सुमित्रानंदन पंत यांच्या जन्मदत्त प्रतिभेला एकांतप्रियतेची जोड मिळाली. पंत मातृवियोगामुळे तर, बालकवी लौकिक जीवनातील आनंद, उल्हास, प्रेम यांच्या कमतरतेमुळे एकांत शोधत राहिले. या एकांतप्रियतेमुळेच दोघेही निसर्गाच्या सान्निध्यात गेले. त्यांच्या कविमनात प्रथम खळबळ उठविली ती या निसर्गानेच. अशाप्रकारे निसर्ग हीच दोघांच्या काव्याची बलवत्तर प्रेरणा बनली. बालकवींच्या बाबतीत प्राय: ही प्रेरणाच सर्वस्व बनून गेली. सांप्रदायिक, वाङ्मयीन, सामाजिक, तात्त्विक आदी प्रेरणांचा बालकवींच्यावर फारसा परिणाम झाला नाही, परंतु निसर्गाच्या बलवत्तर प्रेरणेचे अधिष्ठान राहूनही सुमित्रानंदन पंतांच्या बाबतीत अन्य प्रेरणाही बऱ्याच प्रमाणात कार्यरत राहिल्या. दोघांच्या प्रेरणांमागील साम्यभेदाचा हा विचार आपण मागील प्रकरणात पाहिला. या प्रकरणात या दोन कवींचे निसर्गाशी कशाप्रकारचे नाते दिसते, त्याच्याबाबत या दोघांची भूमिका वा दृष्टिकोण काय होता, निसर्गाकडे पाहण्याच्या दोघांच्या वृत्तीत कशा प्रकारचे साम्य होते या गोष्टींचा विचार करावयाचा आहे.

### वस्तु - व्यक्ति - संबंध -

निसर्गकवितांचा विचार करताना अगदी वरवर एक गोष्ट लक्षात येते की, निसर्गाचे दृश्य समान असताही त्या संबंधीच्या कवीच्या

अनुभूतीत फरक आढळतो. एकाच निसर्गदृश्यावर अनेकांनी कविता लिहिल्या आहेत. अरुणोदय, संध्याकाळ, पौर्णिमा, तारका या विषयांवर अनेकांच्या कविता आढळतात. निसर्गदृश्य समान असल्यामुळे, म्हणजेच वस्तू समान असल्यामुळे या कवितांत काही साम्याचा भाग अपरिहार्यपणे येतोच, परंतु त्या दृश्याकडे पाहण्याच्या भिन्न भिन्न दृष्टिकोणांमुळे त्यांत फरकही आढळतो. सूर्योदय, सूर्यास्त, उषःकाल, चंद्रोदय, तारकाखचित आकाश, नदी, पर्वत, फुले इत्यादींचे बाह्य जगत् फारसे बदलत नाही. बदलणारी असते ती कवीची अनुभूती, कवीचा दृष्टिकोण, कविकृत निसर्गचित्रण असे महत्त्वाचे, तसाच कवीचा त्याकडे पाहण्याचा दृष्टिकोण, त्याच्याशी निर्माण होणारा त्याचा भावबंध या गोष्टींही महत्त्वाच्या असतात, आणि त्यामुळे एकाच विषयावरील निसर्गकवितांत विभिन्नत्व आढळून येते. निसर्गाचे निरीक्षण करीत असताना कवीच्या हृदयात अनेक भाव जागृत होतात. त्याला अनेक कल्पना सुचत असतात. निसर्गचित्रण म्हणजे केवळ वस्तुनिष्ठ वर्णन नसते. ती एक नवनिर्मिती असते. तीमध्ये कवीचा निसर्गाशी असणारा भाव-संबंध स्पष्ट होत असतो. एकाच विषयावरील दोन निसर्गकवितांत बदलत्या भाव-संबंधामुळे फरक पडत असतो. यादृष्टीने बालकवी आणि सुमित्रानंदन पंत यांच्या निसर्गकवितांचा अभ्यास करताना अनेक बाबतीत फरक आढळतो, तसेच काही बाबतीत आश्चर्यकारक असे साम्यही आढळते.

[१] <u>बालसुलभवृत्ती : बालकवी</u> -

बालकवी बालकाची भूमिका स्वीकारूनच निसर्गाशी तदाकार होतात. ही बालसुलभवृत्ती हा त्यांच्या निसर्गकवितेचा ठळक असा विशेष होय. बालकवींची ही बालवृत्ती अनेकांनी सांगितलेली आहे.

आपल्या स्मृतिचित्रात बालकवींच्या आठवणी सांगताना लक्ष्मीबाई टिळक लिहितात, " ठोमरे बालकवी होता - पण कवीपेक्षाही तो बाल अधिक होता. " बहुतेक सर्व मराठी समीक्षकांनी बालकवींच्या बाबत असेच मत व्यक्त केले आहे. प्रा. गंगाधर गाडगीळांनी त्यांच्या बालवृत्तीचे गमक शोधले आहे. डॉ. रा. शं. वाळिंबे लिहितात, " लहान मूल ज्या आश्चर्या--तिरेकाने, उत्कट आनंदाने व तन्मयतेने एखादा नवीन गोष्टीकडे पाहात असते, त्याच आश्चर्यातिरेकाने, उत्कट आनंदाने व तन्मयतेने बालकवी निसर्गाच्या विविध स्वरूपांकडे पाहात आहेत. कुतूहल, आत्यंतिक कुतूहल - ही बालत्व सुलभ गोष्ट बालकवींच्या ठायी भरपूर आहे. "[१] प्रा. द. भि. कुळकर्णी यांनी बालकवींच्या प्रतिभेला " बालवृत्तीचे एकच द्वार होते "[२] असे म्हटले आहे. प्रा. रा. ग. जाधव यांचे म्हणणेही असेच आहे. निसर्गसान्निध्यात बालकवी खरोखरच बाल बनतात आणि त्यातील आपल्या बालसवंगड्यांशी खेळत बसतात.

बालकवींना निसर्गात आपल्या जीवाभावाचे अनेक सवंगडी भेटतात. "सुकलेली फुले" या कवितेत " बाल्यवनींच्या वनविहगांना " ते म्हणतात -

" प्रेमपूर्ण मधु बाल्य अहा ते
तुम्हासंगती येईल येथे,
मीही सोडुनि तारुण्याते
होइन बाल पुन्हा. "

बालकवींना त्यांचे बाल्य असे सतत ओढीत राहिलेले आहे, त्यामुळेच त्यांना निसर्गात सारीकडे बाळरूपेच दिसतात. त्यांचा "निर्झर" कड्यावरून उड्या घेत येतो, तो वेलींच्या बरोबर फुगड्या खेळतो, खडकावरती लोळण घेतो, आपल्या अंगाभवती गरगर फिरतो, तो

---

[१]डॉ. रा. शं. वाळिंबे, फुलराणी [प्रस्तावना] कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे. १९८६ पृ. ७
[२]डॉ. द. भि. कुळकर्णी, म. साहित्य पत्रिका, जाने १९६२ मधील लेख.

हिरवाळीत लपाछपीचा खेळ करतो, पाचूची हिरवी राने झुलवितो, झुळझुळ गाणे गातो. आजूबाजूचे बालतरु त्याला ताल देतात. बालकवी या निर्झराला " तू खेळ खेळून थकला आहेस, बाळा! तू सुखाने क्षणभर नीज बरे, " असे सांगतात, पण आपला हा बाळसवंगडी झोपणे शक्य नाही हेही त्यांना माहीत असते. ते सांगतात,

"झोप कोठुनी तुला तरी, हांस लाडक्या! नाच करी
बालझरा तू बाळगुणी, बाल्यचि रे! भरिसी भुवनी!"

ते आपल्या या लाडक्या झ-याला विनवणी करतात -

" शिकवी रे, शिकवी माते दिव्य तुझी असली गीते!
फुलवेली-लहरी असल्या मम हृदयी उसळोत खुल्या।"

"तृणपुष्पा"ला सृष्टिसतीचे मनोवेधक चिमुकले बाल मानून ते त्याचे स्वागत करतात. सृष्टीच्या मांडीवर त्या लाडक्याला खेळावयाला आणि विहंगांच्या गीतांना ताल धावयाला सांगतात. त्या तृणपुष्पाची मोहकता आणि सततची आनंदाची वृत्ती त्यांच्या मनात कुतूहल निर्माण करते. त्या तृणपुष्पाला ते म्हणतात,

" मैदानावर मी मित्रांसह या खेळाया येतो,
प्रतिवर्षी तुज बघतो येथे, सवेच वेडा होतो,
तुझी चुंबने असंख्य घेतो, धरितो तुज हृदयाशी
तृप्ति न हो परि चित्त धावते, पुन:पुन्हा तुजपाशी
तृणपुष्पा चल, तुज कवितेच्या ठेविन उद्यानात,
सख्या रहा तू तिथे निरंतर, रंजव माझे चित्त."

"बालविहग" या कवितेत ते बालविहगाला "संध्येचा चिमुकला दूत" मानतात,

गगनात झुलणारा मूर्तिमान आनंद समजतात. क्षणभर येथे, क्षणभर तेथे अशा त्याच्या भिंगो-या त्यांचे कुतूहल चाळवतात, गगनातला हा नाचरा आनंदोद्रेक पाहून ते या बालविहगाशी मैत्री जोडू पाहतात. त्याचे नाव जाणून घेऊ इच्छितात. ते त्याला म्हणतात,

" सृष्टिदेविच्या सगुणा बाळा स्वर्गाच्या तान्हया
नावहिं रे तव ठाउक नाही मज गोजिरवाण्या ।"

अशाप्रकारे बालकवी निसर्गामध्ये बालरूप घेऊनच प्रवेश करतात आणि निसर्गवस्तूंत आपल्या बालमित्रांचा शोध घेतात. निर्झर, बालविहग, तृणपुष्प, भ्रमर, फुलपाखरू, संध्यातारक, हे बालसवंगडी तेथे त्यांना भेटतात. "भ्रमर आणि कवि" या कवितेत ते भ्रमराला म्हणतात,

" ये प्रिय सखया, वनलतिकांच्या झोपाळ्यात बसून;
गाऊ सुंदर गीत आपुले, होऊ त्यात विलीन."

" औदुंबर " कवितेतील त्यांचा औदुंबर लहान बालकाप्रमाणे जळात पाय सोडून बसलेला दिसतो. बालकवींचे निसर्गविश्व असे बालवृत्तीत बुचकळून निघालेले आहे. बालकवींनी आपल्या निजशैशवास चांगल्या प्रकारे जोपासलेले, जपलेले दिसते. बालकवींच्या ठिकाणी निसर्गाबद्दल असलेले बालसुलभ कुतूहल लक्षात येण्याच्या दृष्टीने त्यांची खालील कविता लक्षणीय आहे -

"ते डोंगर सुंदर दूर दूरचे बाई, पाहीन गडे त्या हिरव्या हिरव्या राई
त्या विमल जलासह वळणे वळणे घेत, हिंडेन झ-यांच्या शीतल कुंजवनात
दरडीवर बसल्या चढून चिमण्या वेली, परि हाय फुलांची पाखर पायाखाली,
उचलून उराशी धरीन चुंबुनि त्याते, गुंफीन तयांची माला मी निज हाते
ती हरिण-बालके नयनी पाहुनि माते, म्हणतील आज हे नवेच कोणी येथे
उडतील भरारा राघू बोलत बोल, आकाशमंडळी त्यांची माळ खुलेल
कुरणांतहि किलबिल करिती बहिणी सात, मी बघेन भांडण कसले चाले त्यात, [१]

---

[१] पार्वतीबाई ठोमरे- समग्र बालकवी, व्हीनस प्रका. पुणे, प्र.आ. १९६६. पृ. २१२.

लाडिक लडिवाळपणा बालकवींच्या बालवृत्तीचे एक मोठे गमक होय. "गडे", "बाई", "रे" ही संबोधने त्यांच्या कवितांत सर्वत्र विखुरलेली आढळतात. तसेच लाडिक पुनरुक्ती ते पुन:पुन्हा करतात. " निर्झरास" या एकाच कवितेत " जा हळुहळु वळसे घेत ", "खेळुनि खेळ", "या लहरी लहरींमधुनी", "पर्वत हा, ही दरी दरी", "वर खाली गाणे! गाणे!", "शिकवी रे, शिकवी माते!, " "वृत्तिलता ठायीठायी" अशी पुनरुक्तीची अनेक उदाहरणे आढळतात.

" हळुच पाहते, खुणावितेही "या-या" कोणाला ?"

या शब्दांत लहान मुलीचा विभ्रम व्यक्त करणारी "संध्यारजनी" मधील हसरी तारा आणि -

" कुणी नाही ग कुणि नाही
आम्हांला पाहत बाई "

अशा स्वत:ला लपवत हळूच आकाशाच्या अंगणात येणा-या तारका यांचे क्रियाव्यापार जसे बालकवी वर्णन करतात, तसेच "फुलराणी"चे बालिका रूप चित्रित करताना कौतुकाने भरलेला प्रश्न करतात -

"छानी माझी सोनुकली ती, कुणाकडे ग पाहत होती ?"

संध्यातारकाचे आर्जव करताना ते "लडिवाळा" "वेल्हाळा", "बघ ना", "बा रे" अशा लाडिक शब्दांची योजना करतात. असा लडिवाळपणा बालकवींतील बालवृत्तीचाच निदर्शक आहे. तृणपुष्पापासून शुक्रता-यापर्यंत सा-या घटकांचे चैतन्यशील बालरूपच त्यांनी चित्रित केले आहे. बालकवींचा "रविराणा" "प्रभातीचा गोजिरवाणा" सूर्य बनतो आणि बालसुधाकर बालशुक्रावर बालकरांनी अभिषेक करतो. प्र. गंगाधर गाडगीळ लिहितात, " खळाळणारा उल्हास, नादावून जाणारी वृत्ति ही या बालवृत्तीचीच अंगे आहेत. यांमुळे बालकवींची कविता वाचली की पिवळ्या उन्हात

मनसोक्त लोळल्यासारखे वाटते, चांदण्याच्या धारेत वाहून गेल्यासारखे वाटते. ह्या वैशिष्टयांना देखील स्वतंत्र असे वाङ्मयीन मूल्य नाही, पण ती मनाला भुरळ घालतात त्याला काय करायचे! "[१]

बालकवींच्या प्रतिमासृष्टीकडे पाहिले तर तीही बालकाच्या मनाने निर्माण केलेली आहे असे लक्षात येते. त्यांची प्रतिमासृष्टी आपल्याला परीकथांच्या जगात नेऊन सोडते. "फुलराणी"चे लग्न परीकथेतल्या लग्नासारखे आहे. परीकथेत एक राजकुमारी असते, तिला राजपुत्र भेटतो. दोघांची ओळख होते आणि मग बालकांना हवाहवासा गोड शेवट होतो. तसेच काहीसे चित्र फुलराणीच्या लग्नाचे आहे. बालकवींच्या प्रतिमा बालमनाने निर्माण केल्या आहेत, हे लक्षात येण्याच्यादृष्टीने खालील प्रतिमा पाहाण्या-जोग्या आहेत.

१] किंवा "माझी चोरुनी नेली मोत्याची माला"
म्हणुनि नभःश्री रुसली, आली लाली गालाला। -----अरुण

२] निळया झग्यावर वेलबुट्टि तो तुमच्या चढवील
"निगा रखो।" येईल तुम्हाला सरदारी डौल। -------- अरुण

३] कडयावरुनि घेऊन उडया खेळ लतावलयी फुगडया
घे लोळण खडकावरती फिर गरगर अंगाभवती, ---------निर्झरास

४] दहा दिशांनी घांघरुनी या काळया बुरख्याला
काळा बागुल काळोखाचा एक उभा केला ----------- संध्यारजनी

या सर्व प्रतिमा बालवृत्तीतून निर्माण झाल्या आहेत, बालवृत्तीने रंगलेल्या आहेत.

---

[१] प्रा. गंगाधर गाडगीळ, साहित्याचे मानदंड, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पु. आ. १९७७, पृ. ५७

बालकवींमध्ये अशाप्रकारे बालसुलभकुतूहल, शैशवाची जपणूक, बालसुलभ लडिवाळपणा आणि बालसुलभ भावविश्व आढळते. बालसुलभवृत्ती हा त्यांच्या निसर्गकवितेचा प्रधान पैलू आहे.

बालसुलभवृत्ती : सुमित्रानंदन पंत

बालकवींच्याप्रमाणे सुमित्रानंदन पंतही निसर्गातील सवंगड्या-बरोबर खेळत असलेले दिसतात. ते कधी विहगकुमारीशी गप्पा मारतात, कधी चिमण्यांच्या वी-टी-टुट-टुट आणि झ-यांच्या "टीटल मल" या नादाशी तन्मय होऊन जातात, तर कधी "मधुप्रभात" आणि "वसंता"च्या सान्निध्यात स्वत:ला हरवून बसतात. श्री. प्रभाकर माचवे सांगतात, " पंतजी प्रकृति के मुग्धारूप पर बालककी भाँति रीझते थे।"[१] "वीणा" काव्यसंग्रहामध्ये कवीने बालिकेचे व्यक्तित्व धारण केलेले आहे. या बालिकावृत्तीतून "मधुबाला," "कुसुमकलिका", "कुमुदकला", "विहगबालिका" अशा अनेक निसर्गकविता लिहिल्या गेल्या आहेत. बालकवी ज्याप्रमाणे बाल बनून निसर्गात रमतात त्याचप्रमाणे सुमित्रानंदन पंतांतील बालिकाही निसर्गातच दंग होऊ इच्छिते आहे. कवी सांगतात -

"बालिका थी वह भी
सरलपन ही था उसका मन,
निरालापन था आभूषन,
कान से मिले अजान नयन,
सहज था सजा सजीला तन,
रंगीले गीले फूलोंसे"

---

[१] प्रभाकर माचवे-पंत और प्रकृति-सुमित्रानंदन पंत संपादक, शचीरानी गुर्टू, प्र. आत्माराम एण्ड सन्स, दिल्ली, १९५७, पृ. ६३

अधखिले भावोंसे प्रमुदित
बाल्यसरिता के कूलों से
खेलती थी तरंग सी नित।" [पल्लविनी]

" बालकालमें जिसे जलद से " या "वीणा"मधील कवितेत कवीने निसर्गाचा आपल्यावर बालपणी पडलेला प्रभाव चित्रित केला आहे. बालकालात मेघ आणि चंद्रकोरीने त्याला आनंदित केले, तारावळीने त्याचे मनोरंजन झाले, मृदू स्वप्नांनी त्याला कुरवाळले आणि वाऱ्याने त्याच्या केसांचे चंचल-चुंबन घेतले. त्याला फुलांनी हसायला शिकवले, मृदुल लाटांनी पुलकित केले आणि जलबिंदूंनी हेंदकाळून टाकले. कवी सुमित्रानंदन पंत सांगून जातात -

बालकाल में जिसे जलद से
कुमुद कला ने किलकाया,
तारावलि ने जिसे रिझाया,
मृदु स्वप्नों ने सहलाया,
मारुत ने जिसकी अलकों में
चंचल-चुंबन उलझाया,
दीप शलभने जिसे मिचौनी
खेल-खेल कर हुलसाया,
कुसुमों ने हँसना सिखलाया
मृदु लहरों ने पुलकाया,
जिसे ओस जल ने ढुलकाया,
धवल धूलि ने नहलाया,

श्री. गोपाळकृष्ण कौल सुमित्रानंदन पंतांच्या प्रथम चरणातील कवितांत आढळणाऱ्या "बालसरलते"चा आवर्जून उल्लेख करतात. डॉ. इंद्रनाथ मदान लिहितात, " पंत जी की कविता का सबसे बडा तत्त्व

है- उनका प्रकृति प्रेम। जन्मभूमि का पर्वतीय दृश्य और उस पर बचपन से मातृहीन होने से एकान्तचिन्तन ने पंत जी को प्रकृति का चिर-सहचर बना दिया है। हिन्दी में ऐसा कोई कवि नहीं है, जिसने इसप्रकार प्रकृति को अपनाकर जीवन का अंग बना कर रखा हो।"[१] "हिंदी काव्यमें प्रकृति-चित्रण" या आपल्या प्रबंधात डॉ. किरणकुमारी गुप्ता सांगतात, की "वीणेमधील कवीच्या उद्‌गारात लहान बालकाचे भोळेपण आणि निरागस प्रेम दिसते."[२] [मराठी अनुवाद] या कालात निसर्गातील प्रत्येक हालचालीबाबत कवीला कुतूहल आणि मोठे आश्चर्य वाटते. उष:काल त्याच्या हृदयात उत्साह भरतो, शीतल समीर, दवबिंदू आणि प्रभातकालीन पूर्वेचे सोनेरी सौंदर्य पाहून कवी त्यात गुंतून राहतो. बालविहंगिनीचे स्वर्गीय गायन आणि तरूवासिनी कोकिळेचे कूजित ऐकून तो आश्चर्यचकित होतो. बालविहंगिनीला तो विचारतो,

> "प्रथम रश्मि का आना रंगिणि।
> तूने कैसे पहचाना ?
> कहाँ, कहाँ हे बाल विहंगिनि।
> पाया तूने यह गाना ?" [वीणा ५८]

कवी विहगबालेच्या स्वरात आपला स्वर मिळवून टाकतो आणि कोकिळ-कूजिताने त्याचे प्राण मुग्ध होऊन जातात -

> "कूकी थी कोकिल, हिले मुकुल,
> भर गये गंध से मुग्ध प्राण।"

अशाप्रकारे सुमित्रानंदातील बालकवी निसर्गात पल्लव, वीचि-जाल, मधुपकुमारी, किरण, संध्या, ज्योत्स्ना, चंद्रिका, सुगंध, तारका यांचीच

---

[१] डॉ. इंद्रनाथ मदान, कलाकार कविपंत-सुमित्रानंदन पंत-संपा. शचीरानी गुर्टू, आत्माराम, दिल्ली, १९५७. पृ. १००-१०१

[२] किरणकुमारी गुप्ता, हिंदीकाव्य में प्रकृति चित्रण, हिंदी साहित्य संमेलन, प्रयाग संवत्, २०१४, पृ. ४२६

संगत करीत राहिलेला आढळतो. बादल, इंद्रधनुष्य, सरिता, निर्झर, उषा आणि संध्या, दवबिंदू आणि नक्षत्र यांचे त्याला विशेष आकर्षण असलेले दिसते. कवी आपले जीवन गुलाबाप्रमाणे व्हावे अशी इच्छा करतो. हस-या गुलाबाच्या फुलाला तो म्हणतो -

"मुस्कुराते गुलाब के फूल,
कहाँ पाया मेरा बचपन,
सुभग मेरा भोला बचपन
सजग कवि से गुलाब के फूल
तुम्हीं सा हो मेरा जीवन।" [विश्वछवि]

हा कवी पक्ष्यांचे गीत गाऊ इच्छितो, भ्रमरीला गाणे शिकविण्याचा आग्रह करतो आणि सरितेचे गीत शिकण्यासाठी तिच्याजवळ येरझा-या घालतो. तो भ्रमरीला आग्रह करतो,

"सिखा दो ना हे मधुप कुमारि।
मुझे भी अपने मीठे गान।"

आणि विहगबालिकेची अजीजी करतो -

"गाओ, गाओ, विहग बालिके, तरूवर से मृदु मंगलगान
मैं छाया में बैठ, तुम्हारे कोमल स्वर में कर लूँ स्नान।"
[ छाया, पल्लव ]

सुमित्रानंदन पंतांची निसर्गविषयक ही बालसुलभवृत्ती बालकवींच्या तशाच प्रकारच्या वृत्तीशी मिळतीजुळती आहे.

स्वत: सुमित्रानंदन पंतांनी "मेरा रचना-काल" नामक लेखात निसर्गाबद्दलच्या आपल्या या बालकुतूहलांची माहिती दिली आहे. ते लिहितात, " तेव्हा मी छोटासा चंचल भावुक किशोर होतो. माझा

काव्यकंठ अद्यापि फुटलेला नव्हता, परंतु निसर्ग मातृहीन असलेल्या माझ्यातील बालकाच्या कवि जीवनासाठी नकळत तयारी करीत होता. माझ्या हृदयात त्याने गोड, स्वप्नांनी भरलेले मौन अंकित केलेले होते आणि तेच नंतर माझ्यात आपल्या अस्फुट बोबड्या स्वरात गाऊ लागले. पहाडी वृक्षांच्या क्षितिजाने अगणित गहि-या-हलक्या रंगांच्या फुलांत आणि पालवीत सळसळ करून माझ्या अंतरात आपल्या सुंदरतेचे रंगीत, सुगंधित थर जमविले होते. पर्वत प्रदेशाच्या निर्मल, चंचल सौंदर्याने माझ्या जीवनाच्या चारी बाजूला आपल्या नीरव सौंदर्याचे जाळे विणण्यास सुरवात केली होती. माझ्या मनीमानसी बर्फाने भरलेली चमकती शिखरे रहस्याने भरलेल्या शिखरासारखीच उठू लागली होती, आणि त्यांच्यावर पसरलेले नीळे आकाश रेशमी चांदण्याप्रमाणे नजरेसमोर फडकत होते. कितीतरी इंद्रधनुष्यांनी माझ्या कल्पनेच्या पडद्यावर रंगीत रेखा ओढलेल्या होत्या, माझे लहान डोळे वीजांच्या चमचमाटाने दिप्त झाले होते, आणि फेसाळलेल्या झ-यांनी माझ्या मनाला फूस लावून आपल्या बरोबर गाण्यासाठी वाहून नेले होते.[१]" [मराठी अनुवाद]

कवीच्या या निवेदनावरून त्याची बालसुलभवृत्ती स्पष्ट व्हावयास हरकत नाही. कवीने स्वत: सांगितल्याप्रमाणे त्याच्या बालकल्पनेच्या पेटा-यात फुले, पाने, चिमण्या, मेघ, इंद्रधनुष्य, दवबिंदू, तारे, नदी, झरे, उषा, संध्या, कलरव, मर्मर, सरसर या गोष्टी बाहुल्या आणि खेळण्यांप्रमाणे सजून राहिल्या होत्या. अल्मोड्याची रंगीत घाटी या बालकवीला उडत असल्यासारखी वाटत होती—

---

[१] शचीरानी गुर्टू, सुमित्रानंदन पंत, आत्माराम एण्ड सन्स, दिल्ली, १९५७. पृ. ६३, ६४.

"लो, चित्र शलभ-सी पंख खोल
उडने को है चित्रित घाटी
यह है अल्मोडे का वसंत
खिल पडी निखिल पर्वत पाटी।" ---- अल्मोडे का वसंत

सुमित्रानंदन पंतांच्या बालकल्पनेला निसर्गातील दृश्ये अशीच दिसत राहातात.

बालकवी आणि पंत यांच्या बालवृत्तीतील फरक -

कवी हा केवळ कवी नसतो, तो एक सामाजिक व्यक्तीही असतो. त्याच्या वाढत्या वयाबरोबर, व्यक्तिगत विकासाबरोबर निसर्गविषयक वृत्तीमध्ये फरक पडण्याची शक्यता असते. व्यक्तिविकासामुळे त्याच्या निसर्गसंबंधीच्या भावबंधात फरक पडणे शक्य असते. या दृष्टीने विचार करता बालकवी आणि सुमित्रानंदन पंत यांच्यामध्ये मोठा फरक आढळतो. कदाचित बालकवींना अल्पायुष्य लाभल्यामुळे त्यांच्या निसर्गविषयक भावबंधात फारसा फरक येऊ शकला नाही. प्रारंभापासून शेवटपर्यंत ते बालसुलभवृत्तीनेच निसर्गाकडे पाहात राहिले, निसर्गातच आपले सोबती शोधत बसले. तसे पाहिले तर त्यांच्या काही कवितांत सामाजिकता व्यक्त झाली आहे, नाही असे नाही. "संतांचा अनुवाद", "वैष्णवधर्म", "आर्यांची अवनति", "राष्ट्रसेवा", "धर्मवीर" इत्यादी कवितांत काही सामाजिक आशय व्यक्त झाला आहे, पण एकतर त्यांच्या अभंगांत संतांचे केवळ अनुकरण आहे आणि अन्य कवितांत केशवसुती ओजस्वितेचा गंध देखील नाही. निसर्गकविता हेच बालकवींच्या कवितेचे अस्सल आणि खरे रूप होय. या निसर्गाकडे बालसुलभवृत्तीनेच बालकवी शेवटपर्यंत पाहात राहिले. त्यांच्या या बालसुलभवृत्तीत फरक पडू शकला नाही. प्रा. द. भि. कुळकर्णी

यांचे " बालकवींच्या प्रतिभेला बालवृत्तीचे एकच दार होते." हे म्हणणे अगदी यथार्थ असे आहे.[१] सुमित्रानंदन पंतांच्या बाबतीत असे घडले नाही. "वीणा" कालात त्यांच्या ठिकाणी ही बालसुलभवृत्ती पुरेपूर दिसते. "पल्लव" कालात ती थोडीफार टिकून राहिलेली दिसते, पण पुढील काळात मात्र त्यांच्याठिकाणी ती आढळत नाही. पंतांच्या निसर्गाच्या बाबतीत बदलेल्या या दृष्टिकोणाचा अनेकांनी उल्लेख केलेला आहे. प्रभाकर माचवे लिहितात, " निरालांना अर्पण केलेल्या "युगवाणी"त आता निसर्ग मागे पडला आणि मानव प्रधान झाला......... चिंतनाच्या क्षेत्रामध्ये पंत बौध्दिकतेकडे झुकले आणि आता निसर्गाची निरपेक्ष सत्ता अवमानू लागले. आता ते समाजगत मानवाच्या पार्श्वभूमीरूपात निसर्गाचे यथार्थ वर्णन करू लागले."[२] [मराठी अनुवाद] डॉ.इंद्रनाथ मदान यांनी सुमित्रानंदन पंतांच्या या बदलत्या दृष्टिकोणाचा सविस्तर विचार केलेला आहे. ते सांगतात, " युगांतापर्यंत कवीच्या विकासाचे रूप आहे - निसर्गसौंदर्याकडून नारीसौंदर्य, नारीसौंदर्याकडून जीवनदर्शन, आणि जीवनदर्शनाकडून मानव जगताच्या यथार्थ रूपाबद्दलचे प्रेम! जणू काही किशोरावस्थेकडून यौवनावस्था आणि यौवनावस्थेकडून प्रौढावस्था यांच्याकडची ही स्वाभाविक गतीच आहे." पुढे ते लिहितात, " अशा प्रकारे त्याने सामंतवादाकडून भांडवलशाही आणि भांडवलशाहीकडून साम्यवादापर्यंतच्या भावनेला आपल्या काव्यात स्थान दिले."[३] आणि गोपालकृष्ण कौल यांच्याच शब्दात सांगावयाचे तर," "वीणा" से "युगांत तक कवि का विकास प्रकृति से मानव की ओर, कल्पना से चिंतन की

---

[१] द.भि.कुळकर्णी, म.सा.प.जाने १९६२ मधील लेख.

[२] शचीरानी गुर्टू, सुमित्रानंदन पंत,आत्माराम एण्डसन्स, दिल्ली, १९५७, पृ.११२

[३] शचीरानी गुर्टू, सुमित्रानंदन पंत,आत्माराम एण्डसन्स, दिल्ली, १९५७, पृ.११४.

और, नारी-कला से पौरुष-कला की ओर है।"[१] सुमित्रानंदन पंतांची निसर्गाकडे पाहण्याची ही बदलेली दृष्टी काही उदाहरणांनी स्पष्ट करता येईल. प्रारंभीच्या काळात निसर्गालाच आपले सर्वस्व मानणारा कवी पुढील काळात मानवाला निसर्गाहून अधिक सुंदर मानू लागला -

"सुंदर है विहग, सुमन सुंदर
मानव! तुम सबसे सुंदरतम!"

आता तो निसर्गाला सांगू लागला,

हार गई तुम
प्रकृति!
रच निरुपम
मानव कृति!

एवढेच नव्हे, तर मानवानेच निसर्गाला पूर्णता दिली असेही तो म्हणू लागला,

पूर्ण हुई तुम, प्रकृति
आज बन मानव की कृति।

प्रारंभकाळात प्रियतमेच्या प्रेमापेक्षा निसर्गप्रेम श्रेष्ठ असल्याचे पंत सांगत होते. ते म्हणत होते,

" छोड द्रुमों की मृदु छाया,
तोड प्रकृति से भी माया,
बाले! तेरे बाल-जाल में
कैसे उलझा लूँ लोचन ?

---

[१] शचीरानी गुर्टू, सुमित्रानंदन पंत, आत्माराम एण्डसंन्स, दिल्ली, १९५७, पृ. १३८.

प्रियतमेच्या केशकलापापेक्षा वृक्षांची मृदू छाया, तिच्या भ्रूभंगापेक्षा इंद्रधनुष्याचे रंग, तिच्या स्वरालापापेक्षा कोकिल-कूजित आणि तिच्या अधरामृतापेक्षा कोवळ्या पालवीतून ढळणारे दवबिंदू कवीला अधिक प्रिय वाटत होते, पण पुढे निसर्गातील दृश्ये पाहून त्याला आपल्या प्रियतमेची आठवण होऊ लागल्याचे दिसून येते. "सुधि" नामक कवितेत कवी म्हणतो,

"तडित-सा सुमुखि। तुम्हारा ध्यान
प्रभा के पलक मार, उर चीर,
गूढ गर्जन कर जब गंभीर
मुझे करता है अधिक अधीर,
· जुगुनुओं से उड मेरे प्राण
खोजते हैं तब तुम्हें निदान।"

थोडक्यात, बालकवींची बालसुलभवृत्ती शेवटपर्यंत तशीच राहिली, पण सुमित्रानंदन पंतांमध्ये ही वृत्ती कायम राहू शकली नाही.

## [२] स्वप्नाळूपणाची वृत्ती : बालकवी

स्वप्नाळूवृत्ती हा बालकवींचा फार मोठा विशेष होय. स्वप्नसृष्टीचे इंद्रजाल त्यांना पराकाष्ठेचे मोहक वाटत होते आणि त्यामुळे ते सतत स्वप्नसृष्टीत गुंगून राहिलेले दिसतात. या स्वप्नाळू वृत्तीमुळे ते परीकथांच्या जगात वावरत असलेले दिसतात. त्यांच्या साध्याभोळ्या फुलराणीला प्रणयाचे मधुर स्वप्न पडते. स्वप्नाळू कवी सांगतो,

"त्या देवीला ओव्या सुंदर - निर्झर गातो, त्या तालावर
झुलुनि राहिले सगळे रान - स्वप्नसंगमी दंग होउन।
प्रणयचिंतनी विलीनवृत्ती - कुमारिका ही डोलत होती,
डुलता डुलता गुंग होऊनी - स्वप्ने पाही मग फुलराणी।"

येथे बालकवींचे मनच फुलराणीच्या डोळयांनी रम्य स्वप्ने पाहते. बालकवींनी एकदा या स्वप्नसृष्टीत प्रवेश केला म्हणजे त्यांची

"आनंदी - आनंद गडे।
इकडे, तिकडे, चोहिंकडे,"

अशी बेभान अवस्था होऊन जाते. जगातील व्यथा आणि वेदनांचा येथे मागमूसही नसतो. सगळीकडे स्वर्गीय संगीताच्या लकेरी बालकवींना ऐकू येऊ लागतात. उरते ते फक्त स्वप्नसृष्टीतील मदिर आणि धुंद वातावरण. अशा वातावरणाचे आणखी हे एक चित्र -

"हळुवार हिमाचे अवगुंठन हलवोनी
बोलेल सर्व निद्रिस्त विश्व म्हणवोनी
सारून जरा कचभार बालिका पाहे
एकेक तारका समाधिचे सुख लाहे.
निद्रिस्त भूमिला स्वप्न जणो हे दिसले,
स्वप्नात लाडके, सुंदर डोळे भिजले." [पाखरास]

अशी स्वप्नसृष्टी बालकवींच्या अनेक कवितांत आढळून येते.

बालकवींनी निसर्गाची चितारलेली दृश्ये प्राधान्याने कल्पना--सृष्टीतील आहेत. ते निसर्गदृश्याभोवती रुचिर काल्पनिक वातावरण निर्माण करतात, आपल्या स्वत:च्या भावनांचा वस्तुजातावर आरोप करतात आणि अशाप्रकारे निर्माण केलेल्या स्वप्नमय जगाशी समरसून जातात. निसर्गातील दृश्यांचे यथातथ्य अनुकरण करून वास्तववादी चित्र रेखाटण्याचा प्रयत्न त्यांच्या काही कवितांत आढळतो, तथापि त्यांचा अधिक कल कल्पनारम्य चित्रे रेखाटण्याकडेच दिसून येतो. या दृष्टीने त्यांच्या" बाळे ती खेळत होती" आणि "ताराराणी" या कविता पाहण्याजोग्या आहेत. या कवितांतील दृश्ये स्वप्नसृष्टीतील असली

तरी यांतील कल्पना-विलास इतका उत्कृष्ट आहे की, ती दृश्ये स्पष्टपणे रसिकांच्या डोळ्यांसमोर उभी राहातात. बालकवींच्या कल्पना-विलासाचे हे मोठे वैशिष्टय होय. बालकवींच्या कविता वाचत असता आपण अप्सरांच्या आणि प-यांच्या रम्य सृष्टीत जातो, बालकवींच्या कल्पनांनी डवरलेल्या पारिजातकाच्या झाडाखाली सुगंधाचा आस्वाद घेत राहातो.

## स्वप्नाळूपणाची वृत्ती : सुमित्रानंदन पंत

बालकवींची ही स्वप्नाळूवृत्ती सुमित्रानंदन पंतांच्या निसर्ग कवितांत फारच थोडी आढळते. बालकवींच्या प्रमाणे ते निसर्गवस्तूंत आपले संगीसोबती शोधतात, पण बालकवी निसर्गदृश्याच्या बाबतीत ज्या जातीचा कल्पना-विलास करतात तशा प्रकारचा कल्पनाविलास पंतांच्या कवितेत अभावानेच आढळतो. ते मधुप कुमारीपाशी आपले गोड गाणे शिकविण्याची विनंती करतील, सरितेचे गाणे शिकण्याची इच्छा करतील किंवा विहग बालिकेच्या कोमल स्वरात स्नान करु पाहतील. कधी अल्मोडयाची रंगीत घाटी उडत चालली आहे असे त्यांना भासेल, तर कधी गिरिशिखरे आणि मेघ यांचा लपंडाव चालला आहे असेही ते समजतील. त्यांच्या "बादल" कवितेतील कल्पना-विलास काहीसा बालकवींच्या कल्पनाविलासासारखा आहे. त्यांचे मेघ प-यांच्या बालकासारखेच शुभ्र-शिंपल्यांचे पंख पसरतात आणि चंद्राचा सुकुमार हात पकडून चांदण्याच्या समुद्रात आनंदाने पोहत राहतात. दमयंतीसारख्या चंद्रकलेच्या अभिराम रजत हातांमध्ये कुरवाळले जात असताना ते सोनेरी हंसाप्रमाणे तिला प्रिय संदेश देतात. बादल म्हणतात,

“ फिर परियों के बच्चों-से हम
सुभग सीप के पंख पसार

समुद पैरते शुचि ज्योत्स्ना में
पकड इन्दु के कर सुकुमार!
दमयन्ती-सी कुमुद कला के
रजत करों में फिर अभिराम
स्वर्ण हंस से हम मृदु ध्वनि कर,
कहते प्रिय संदेश ललाम! [बादल-वीणा]

सूर्योदयापूर्वी कितीतरी आधी पक्ष्यांना जाग येते आणि ते चिवचिवाट करू लागतात. या पक्ष्यांना सूर्याच्या पहिल्या किरणाची कशी काय चाहूल लागते असे कुतूहल कवीमध्ये जागे होते आणि तो विहंगिनीला विचारतो,

सोई थी तू स्वप्न नीड में
पंखों के सुख में छिपकर,
ऊँघ रहे थे, घूम द्वार पर,
प्रहरी से जुगनू नाना,
प्रथम रश्मि का आना रंगिणि।
तूने कैसे पहचाना? [वीणा, ५८]

"बादल" कवितेतील हा आणि अन्य कडव्यातील कल्पनाविलास बालकवींच्या कल्पनाविलासाशी बराच मिळता जुळता आहे.

बालकवी आणि सुमित्रानंदन पंत यांच्या कवितांत कल्पनाविलासाचा असा मिळताजुळता थोडा फार भाग आढळतो हे खरे आहे. दोघांतही उत्तुंग कल्पनाशक्ती आहे, पण बालकवींच्यामध्ये ज्या जातीचा स्वप्नाळू कल्पनाविलास आढळतो तसा सुमित्रानंदन पंतामध्ये फारच थोडा दिसतो. बालकवींचे जगत प्राधान्याने स्वप्नमय जगत असते, तर पंतांचे जग हे बरेचसे वास्तव जगत असते. बालकवींनी तशा निसर्गाचे यथातथ्य वर्णन

करणाऱ्या काही कविता लिहिल्या आहेत. त्यांच्या "श्रावणमास", "औदुंबर", "पारवा" या कवितांत निसर्गाचे यथातथ्य चित्रण आहे, परंतु अशा चित्रणापेक्षा त्यांचा कल काल्पनिक जगताकडे अधिक आढळतो, या उलट सुमित्रानंदन पंतांच्या बहुसंख्य निसर्गकवितांत ते स्वप्नाळू जगापेक्षा वास्तव जगाकडे झुकलेले दिसतात. पहिल्यात भावपक्ष प्रबल, तर दुसऱ्यात विभावपक्ष बलवत्तर. दोघांच्या कल्पनाविलासात फरक पडतो तो त्यामुळेच. सुमित्रानंदन पंतांनी निसर्गाची यथातथ्य चित्रे अनेक कवितांत रेखाटली आहेत. त्यांच्या कवितातील ही यथातथ्यता स्पष्ट होण्याच्या दृष्टीने त्यांची "गुंजन" नामक कविता उदाहरणादाखल देता येईल -

" वन-वन, उपवन -
छाया उन्मन-उन्मन गुंजन।
नव-वयके अलियोंका गुंजन।
रुपहले, सुनहले आम्र बौर,
नीले, पीले, औ ताम्र भौंर,
रे गंध-अंध हो ठौर- ठौर
उड पाँति- पाँति में चिर- उन्मन
करते मधु के वनमें गुंजन।
वन के विटपों की डालडाल
कोमल कलियों से लाल-लाल,
फैली नव-मधु की रूप ज्वाल,
जल-जल प्राणों के अलि उन्मन
करते स्पन्दन, करते गुंजन।
अब फैला फूलों में विकास,
मुकुलों के उर में मदिर-वास,
अस्थिर सौरभसे मलय-श्वास,

जीवन-मधु-संचय को उन्मन
करते प्राणों के अलि गुंजन! "

असे यथातथ्य चित्रण असलेल्या अनेक निसर्ग कविता पंतांच्या काव्य-
-संग्रहांत आढळतात.

[३] मानवीकरण : बालकवी

मानवी मनाची एक प्रवृत्ती अशी की, ते अपरिचिताला साम्यधारे जाणून घेण्याचा प्रयत्न करते. निसर्गाशी असे सादृश्य स्थापित करणे फारच सोपे असते. अनादी कालापासून मानवाला निसर्गाचे साहचर्य लाभले आहे. निसर्गातील पशुपक्ष्यादींच्या सचेतन सृष्टीत मानवाप्रमाणेच रत्यादिक भावना आढळतात. निसर्गाच्या संचलनात एक नियमितपणाही आहे. सामान्य माणसानेही निसर्गाला सचेतन मानावे अशीही कारणे आहेत, मग कवींच्या दृष्टीने तो चैतन्याने रसरसलेला असावा यात मुळीच आश्चर्य नाही. कवी निसर्गाला सचेतन मानत आलेले आहेत. त्याच्याशी एक नाते जोडीत आलेले आहेत. वृक्षवल्लरींशी सोयरीक जुळत राहिलेली आहे. कवी आपल्या भावभावनांचा, आपल्या गुणांचा त्याच्यावर आरोप करीत आले आहेत. निसर्गावर मानवी भावभावनांच्या आणि गुणांच्या अशा आरोपाला "मानवीकरण" असे म्हणतात. बालकवी आणि सुमित्रानंदन पंत या दोघांतही मानवीकरणाची ही प्रवृत्ती अतिशय प्रबल रूपात दिसते. याबाबतीत दोघांत विलक्षण साम्य आढळते.

बालकवींचा निसर्ग प्राधान्याने मनुष्य रूपातच व्यक्त झाला आहे. सारा निसर्ग त्यांना चैतन्याने भरून गेलेला वाटतो. तारकांच्या प्रकाशात त्यांना तारकांचे गाणे ऐकू येऊ लागते. रात्री सारे विश्व शांत झाले असता त्यांना रजनीमातेची अंगाई ऐकू येऊ लागते. निर्झराच्या खळखळाटातून

त्यांना निर्झराचा जीवित संदेश समजतो. निसर्गातील फुले, तारे, पक्षी, निर्झर, सरिता, रजनी, सूर्य, चंद्रिका, मेघ, वारा - या सा-या गोष्टी त्यांच्या कवितांत सचेतन रूपात वावरताना आढळतात. त्यांचा "बालविहग" हा सगुणा बाळ बनतो, "निर्झर" लतावलयी फुगडया खेळत, दंगामस्ती करीत पुढे पुढे जातो, "संध्यातारका"ला रजनी ओव्या गाऊ लागते, "फुलराणी" गोजिरवाण्या रविकराच्या प्रेमात पडते, भास्कर जाता जाता साखरचुंबा घेतो, "फुलपाखरू- फुलवेली" तील फुलपाखरू सृष्टीचे गोजिरवाणे तान्हे बनते - निसर्गातील प्रत्येक वस्तू अशाप्रकारे बालकवींच्या निसर्गकवितांत मनुष्य रूपामध्ये वावरते.

बालकवींनी "निर्झरास" या कवितेत निर्झराच्या गतीला, नाद-लयाला जणू बालक्रीडेचा पेहरावच चढविला आहे. ते निर्झरास सांगतात,

"कडयावरुनि घेऊन उडया
खेळ लतावलयी फुगडया
घे लोळण खडकावरती,
फिर गरगर अंगाभवती,
जा हळुहळु वळसे घेत
लपत-छपत हिरवाळीत."

एखादे गोंडस, खोडसाळ, आनंदी बालक मुक्तपणे ज्या क्रिया एकटेच असताना, रम्य निसर्गाच्या सान्निध्यात करील तशीच गती, वृत्ती निर्झराची आहे. उडया मारणे, फुगडया खेळणे, लोळणे, अंगाभोवती गरगर फिरणे, लपत-छपत वाकडया वाटेने वळसे घेत घेत जाणे हया सा-या क्रिया बालकाच्या आहेत. फक्त त्या "निर्झराने" केल्या आहेत म्हणून तो "बालगुणी" "बालझरा" आहे. हिरवळीवर डोलणारी मुग्धा फुलराणी- तिच्या निरागस मनात "गोजिरवाण्या" "रविकरा"बद्दल प्रेमभावना निर्माण

करणारा सृष्टीदूत संध्यावात विनोदी आहे. त्याने केलेली प्रेमजागृती बालकवी अशा शब्दांनी चितारतात -

" तोच एकदा हासत आला - चुंबून म्हणे फुलराणीला
छानी माझी सोनुकली ती - कुणाकडे ग पाहत होती ? "

"छानी", "सोनुकली" या शब्दांनी जसे फुलराणीचे बाल्य सूचित होते, तसेच संध्यावाताची विनोदी कृतीही एका निर्मल भावनेची अभिव्यक्ती ठरते. मुग्ध, अल्लड बालिकांची चंचलता, सर्वांपासून स्वत:ला लपवून एखादा खोडसाळपणा करण्याची ऊर्मी याचे सुंदर निसर्गचित्रण बालकवी "तारकांचे गाणे" मध्ये रेखाटतात -

" कुणि नाही ग कुणि नाही
आम्हांला पाहत बाई "

असे म्हणत म्हणत एकामागून एक येणा-या आकाशीच्या या मुग्ध कळ्या कवीप्रमाणे आपणही पाहू लागतो, त्यांचे म्हणणे उत्सुकतेने ऐकू लागतो. त्यांच्या सा-या क्रियांत लाजतलाजत पुढे जाणे, हळूच पाहणे-हसणे, काहीतरी खेळणे, सुंदरतेला नटवणे, कोमलतेला खुणवणे, दवबिंदू इकडेतिकडे उधळून देणे, नदीच्या लहरींवर नाचणे, लतिकांत लपणे, तरुण तरुणींच्या मीलनात धिटाई करणे यांत आपण रमतो. अशा चित्रातून एखादी कुमारीकाच बालकवी चितारतात. "फुलवेली-फुलपाखरु", "तृणपुष्प", "सृष्टीच्या आयकास" इत्यादी अनेक कवितांतून बालकवी मानवी क्रियांचे निसर्गाशी मीलन घडवतात. मानवीकरणाच्या या वृत्तीच्या दृष्टीने बालकवींच्या अनेक कवितांचा निर्देश करावा लागेल. "अरुण", "निर्झरास", "संध्यारजनी", "फुलराणी", तारकांचे गाणे", "संध्यातारक", "फुलपाखरु-फुलवेली", "बालविहग", "तृण-पुष्प", "शारदीय सौंदर्य-देवता", "सृष्टीच्या गायकास", "गवताचे पाते ", "भारद्वाजास", "दवबिंदू" अशा त्यांच्या

अनेक कवितांत मानवीकरणाची प्रबल प्रवृत्ती दिसते.

बालकवींच्या मानवीकरणात कधी निसर्गातल्या घटनांवर मानवी घटनांचे रूपक रचलेले आढळते, कधी निसर्गावर मानवी भावनांचा आणि गुणांचा आरोप केला जातो, तर कधी निसर्गात आढळणाऱ्या दु:खपूर्ण स्थितीबद्दल सहानुभूती व्यक्त होते. "फुलराणी" या कवितेत मानवी विवाहाच्या घटनेचे रूपक रचलेले आहे. खेळणे, बागडणे, उड्या मारणे, यांसारख्या मानवी क्रियांचा आरोप तर अनेक कवितांत आढळतो, पण एरव्ही निसर्गात सर्वत्र आनंद भरलेला जाणवत असला तरी क्वचित्प्रसंगी निसर्गातही दु:खाचा सूर ऐकू येतो आणि मग कवी त्याच्याबद्दल सहानुभूती व्यक्त करतो. "सुकलेली फुले", "पारवरास" यांसारख्या कवितांत हा सहानुभूतीचा भाव दिसतो. "सुकलेल्या फुला"बद्दल कवी म्हणतो,

"कालतरूची गलित फुलें ती
पुनरपि फुलतिल का मजभोती ?
स्मरता त्यांना अहा उसळती
हृदयाच्या वृत्ती.
स्मरणाच्या थडग्यातुनि या रे।
सुमनांनो भूवरती सारे।
खेळ करू ते पुन्हा एकदा
पूर्वी जे केले
दिव्य माझिया नक्षत्रांनो।
बाल्यवनीच्या वनविहगांनो।
या चिमण्यांनो। या छकुल्यानो।
या, या, या आता."

"पारवा" या कवितेत ते पारव्याला "तुझ्या चित्तात कुठे दुखते खुपते की काय ते सांग, सांग बा रे" अशी सहानुभूतीने भारावलेली विचारणा करतात. "गाणा-या पक्ष्यास" या कवितेत घोर रानात भयाण रात्री एकट्याने गात राहिलेल्या पक्ष्यास ते सांगतात की "हे रम्य पक्ष्या, तुझ्या गानाचे येथे मोल नाही. ते दीनवाणे होईल आणि म्हणून तुझे गाणे आता थांबव" आणि "पाखरास" या कवितेत ते त्याची समजावणी करतात -

" पाखरा, गाइले तुला कधीहि न कोणी
न च अश्रु गाळिले कुणी वनी येवोनी ।
नि:श्वास धावती सौख्यामागे सारे,
दु:खाचा वाली कुणी कुणीहि न बा रे । "

## मानवीकरण : सुमित्रानंदन पंत

सुमित्रानंदन पंत "छायावादा"चे एक प्रमुख आधारस्तंभ होते. हिंदीमधील या साहित्यिक वादाचा "निसर्गाचे मानवीकरण" हा ठळक विशेष आहे. या छायावादाने निसर्गाला चेतन मानलेले आहे आणि त्याच्यावर स्त्री-पुरुषांच्या जीवनात निर्माण होणा-या प्राय: सर्व भावनांचा आरोप केलेला आहे. साहजिकच हे वैशिष्ट्य पंतांच्या काव्यात स्पष्टपणे दिसून येते. ते कधी फुलपाखराच्या विविध रंगांनी मुग्ध होतात, कधी काजवे आणि सुभग विहंगाशी गप्पा मारू लागतात, कधी नदी आणि मधुपकुमारीला त्यांचे गाणे शिकवण्याची प्रार्थना करतात, तर कधी चंद्रिका, संध्या, निर्झरिणी, वायू आणि मेघ यांच्याशी एकात्मता स्थापित करतात. त्यांना जड मातीदेखील सचेतन भासू लागते. ते मेघांना सचेतन मानून त्यांचे वर्णन करतात -

" कभी चौकडी भरते मृग से
भू पर चरण नहीं धरते
मत्त मतंगज कभी झूमते
सजग शशक नभ को चरते। "

"वीचिविलास" या कवितेत त्यांनी लहरीचे अनेच सजीव रूप चित्रित केलेले आहे. चंचल जललहरीला ते "तुझ्यात हा स्वर्गीय उल्हास कुठून आला ?" असा प्रश्न करतात. अल्मोडयाची घाटी त्यांना चित्रशलभा--प्रमाणे आपले पंख उघडून उडू पाहाते असे वाटते; आणि पर्वत आपल्या फुलांच्या डोळयांनी पायाशी पडलेल्या आरश्यासारख्या जलाशयात पाहून आपले प्रसाधन करीत आहे असे वाटते -

" मेखलाकार पर्वत अपार
अपने सहस्त्र दृग-सुमन फाड
अवलोक रहा है बार-बार
नीचे जल में निज महाकार
जिसके चरणों में पला ताल
दर्पण सा फैला है विशाल ! "

बालकवींच्याप्रमाणे सुमित्रानंदन पंतांनाही निसर्गात तारुण्यसुलभ क्रीडा चालल्याचे वाटते, परंतु बालकवींच्या अशा प्रेमचित्रणात कधी मांसल ऐन्द्रियता आढळत नाही किंवा ते कधी निसर्गावर प्रेयसीचा आरोप करीत नाहीत. बालकवींची वृत्ती बालसुलभतेचीच राहते. याउलट सुमित्रानंदन पंत निसर्गामध्ये नारी भावनेला प्राधान्य देताना दिसतात. गंगा नदी तापस बालेच्या रूपात दुग्ध-धवल तन्वंगी बनून त्यांच्यासमोर येते, आणि मग नारीसुलभ अनेक चंचल विभ्रमांचो ते व्यंजना करतात -

"तापस बाला गंगा, निर्मल, शशिमुख से दीपित मृदु करतल
लहरे उर पर कोमल कुंतल।
गोरे अंगोंपर सिहर सिहर लहराता तार तरल सुंदर,
चंचल अँचल सा नीलांबर।
साड़ी की सिकुडन-सी जिस पर, शशि की रेशमी विभा से भर,
सिमटी है वर्तुल मृदुल लहर। "

विजन निशाकाली लता तरुवराला आलिंगन देते, वारा प्रसूनांच्या ओठांचे चुंबन घेतो. कवी वियोग विदग्ध अवस्थेत असला तरी शैवालिनीला सागराकडे जाऊन त्याला भेटावयास सांगतो. अनिलाला गगनाला आलिंगन देण्यास आणि चंद्रिकेला तरंगांच्या अधराचे चुंबन घेण्यास सुचवितो. त्याचे नीळे आकाश हरितधरेवर प्रेमभराने झुकते. निसर्गात चाललेल्या अशा ऐन्द्रिय प्रेमक्रीडेचे चित्र सुमित्रानंदन पंतांच्या अनेक कवितांत येते. याद्रुष्टीने खालील उदाहरण पाहाण्यासारखे आहे--

" मिट्टी की सौंधी सुगंध से
मिली सूक्ष्म सुमनों की सौरभ,
रूप, स्पर्श, रस, शब्द, गंध की
हरित धरा पर झुक नील नभ।
क्या समीर ने लिपट विटप को
किया पल्लवों में रोमांचित ?
अँगडाई ले बाँह खोलना
सिखलाया डालों को कम्पित
क्या किरणों ने चूम खिलाये
रंग भरे फूलों के आनन ?
सृजन प्राण रे स्पर्श प्रेम का
सच है, जीवन करता धारण। "

शरद ऋतूतील चंद्रिका म्हणजे कवीला एकाकिनी स्त्री वाटते. निळया आकाशाच्या शतदल कमळावर ही शारदहासिनी बसलेली आहे. आपल्या मृदू तळहातावर आपले शशिमुख धरून ही एकाकिनी आपली एकाकी अवस्था व्यक्त करीत आहे.

सुमित्रानंदन पंत अशाप्रकारे निसर्गामध्ये नारीचे, प्रियतमेचे प्रतिबिंब पाहातात. सुमित्रानंदन पंतांना निसर्गातील दु:ख, दैन्याची जाणीव आहे. सुकलेल्या फुलांच्याबद्दल बालकवींनी जशी आपली व्यथा व्यक्त केली आहे, त्याचप्रमाणे फुलाच्या क्षणिक वैभवाच्या -हासावर पंतांनी आपल्या हृदयातील वेदना व्यक्त केली आहे. या कुसुमाची अस्थिर प्रफुल्लता त्यांना द्रवित करते. पिवळ्या पडलेल्या पानांचे वियोग दु:ख त्यांना जाणवते आणि सहानुभूतीने त्यांचे हृदय भरून येते. प्रेमवेदीवर आपले सर्वस्व कुर्बान करून टाकणा-या दग्ध शलभाला पाहून ते करुणार्द्र होतात आणि अश्रू ढाळू लागतात -

" दग्ध शलभों की विनीरव वेदना
धो चुकी हूँ आँसुओं की बाढ से।" [ग्रंथि]

वृक्षापासून विलग झालेल्या छायेला पाहून त्यांचे हृदय व्यथित होते. ते आपले हृदय चाचपडून पाहू लागतात, तर तेथेही एक पीडा त्यांना जाणवते आणि मग समदु:खी छायेबद्दल एक सहानुभूती निर्माण होते. निसर्गाशी होणा-या अशा एकात्मतेची काही चित्रे पंतांच्या कवितांत आली आहेत. त्यांतील हे एक चित्र लक्षणीय आहे -

अहा! अभागिन हो तुम मुझसी
सजनि ध्यान में अब आया।
तुम इस तरुवर की छाया हो
मैं उनके पद की छाया ।। [पल्लविनी]

निसर्गातील दु:खाबद्दल कवीने सहानुभूती व्यक्त करावी, यात फारसे नवल नाही, पण कवीच्या दु:खाने निसर्ग दु:खी होतो आणि तो कवीबद्दल सहानुभूती व्यक्त करतो अशा चित्रणात ते निश्चित आहे. माणसाच्या दु:खाने निसर्ग दु:खी झाल्याची काही चित्रे पंतांच्या कवितेत आहेत. त्यांची चंद्रिका जगाच्या दु:ख दैन्याने अश्रू गाळीत असलेली दिसते. –

जग के दु:ख दैन्य शयन पर
यह रूग्णा जीवन बाला
रे कब से जाग रही वह
आँसू की नीरव माला। [चाँदनी, पल्लविनी]

चंद्रिका मानवाच्या दु:ख दैन्याने येथे दु:खी झालेली आहे. माणसाचे दु:ख पाहून निळे आकाशदेखील दवबिंदूच्या रूपाने अश्रू गाळते, समुद्राचे मन गहिवरते आणि नक्षत्रांवर शहारे उभे राहातात –

"अचिरता देख जगत की आप, शून्य भरता समीर नि:श्वास
डालता पातोंपर चुपचाप, ओस के आँसू नीलाकाश,
सिसक उठता समुद्र का मन, सिहर उठते उडगन।"

[परिवर्तन–पल्लव]

बालकवी आणि सुमित्रानंदन पंत यांच्या मानवीकरणातील फरक –

बालकवी आणि सुमित्रानंदन पंत दोघांमध्ये मानवीकरणाची प्रबल प्रवृत्ती आढळते. मानवीकरणाची असंख्य उदाहरणे दोघांच्याही काव्यात मिळतात. निसर्गावर मानवी भाव भावनांचा आणि गुणांचा आरोप दोघांनीही केला आहे दोघांच्यातील ही प्रवृत्ती समान असली तरी

तीमध्ये थोडाफार फरक आढळतो. बालकवी आपल्या मानवीकरणावर मानवी घटनांचा आरोप करतात. मानवी विवाह सोहळ्याची चित्रे त्यांच्या कवितेत दिसतात. पंतांच्या कवितेत असा मानवी घटनांचा आरोप कमी आढळतो. सुमित्रानंदन पंत प्रेयसी रूपात निसर्गाकडे पाहातात. बालकवींनी प्रेयसी रूपाने निसर्गाकडे पाहिलेले नाही. बालकवींच्या मानवीकरणात आलिंगन, साखरचुंबा अशी दृश्ये आली, तरी त्यात बालसुलभत्वच आढळते. त्यांच्या तशा प्रकारच्या मानवीकरणात ऐन्द्रियतेचा स्पर्श होत नाही, परंतु सुमित्रानंदन पंतांच्या मानवीकरणाला ऐन्द्रियतेचा स्पर्श झालेला दिसतो. पंतांच्या प्रेमव्यापारात बालसुलभतेपेक्षा एक प्रौढता आढळते.

"अगणित-बाहें बढा उदधि ने इन्दु करों से आलिंगन।
बदले, विपुल चटुल-लहरों ने तारों से फेनिल-चुम्बन।" [पल्लव]

अशा त-हेची चित्रे बालकवींच्या मानवीकरणात आढळत नाहीत. बालकवी निसर्गाच्या दु:खामध्ये सहानुभूती व्यक्त करतात, पण अशी चित्रे एकंदरीने फार थोडी. पंतांच्या अशाप्रकारच्या सहानुभूतीत अधिक व्यापकता आहे. बालकवींना सृष्टीमध्ये इकडे तिकडे आनंदी आनंदच आढळतो. पंतांना या आनंदाबरोबरच सृष्टीच्या दु:खाची पुरेशी जाणही दिसते. बालकवींचा निसर्ग मानवाच्या दु:खाने दु:खी झालेला कुठेही आढळत नाही. याउलट पंतांचा निसर्ग मनुष्याच्या दु:खात सहभागी होऊन अश्रू ढाळताना दिसतो. मनुष्य आणि निसर्ग "उभय है अन्योन्याश्रित" अशी पंतांची विचारसरणी असल्यामुळे त्यांच्या मानवीकरणात बालकवी-पेक्षा अधिक व्यापकता दिसून येते. बालकवींच्या मानवीकरणात प्राय: एकरसता आहे, तर पंतांच्या मानवीकरणात अनेक रंग आहेत.

[४] सौंदर्यासक्ती : बालकवी

सृष्टीचे सौंदर्य उकलून दाखवण्यासाठीच आपला जन्म झाला आहे अशी बालकवींची श्रध्दा होती. आपल्या वृत्तीचे जडत्व विसरून सौंदर्याची प्रतीती घेण्याचा अखंड ध्यास त्यांना लागला होता, आणि मग अशा सौंदर्याचे दर्शन झाले की, त्यांना जिकडे तिकडे आनंदच आनंद भरून राहिला आहे असे वाटे. "जिकडे तिकडे गाणेच गाणे" भरलेले आहे, "जिकडे तिकडे दिव्य साठले आहे" असे त्यांना भासू लागे. बालकवींचा सौंदर्याचा हा ध्यास सर्वत्र दिसतो. ते म्हणतात,

१. सुंदरतेच्या सुमनावरचे दंव चुंबुनि घ्यावे,
चैतन्याच्या गोड कोवळ्या उन्हात हिंडावे --- [बालविहग]

२. सौंदर्याच्या नव नव लीला,
त्या उठल्या मम हृदयात. --- [तडाग असतो तर]

३. सौंदर्ये शब्दातीत - स्वर्भूवर अवतरतात
तेजाची फुटली पेठ - दिव्यत्त्वाची लयलूट --- [शुक्रोदय]

बालकवींना निसर्गातील सौंदर्यामुळेच निसर्गाचा सहवास हवाहवासा वाटला. निसर्ग त्यांना कधी गुरूप्रमाणे उपदेशक किंवा ईश्वराप्रमाणे अलौकिक वाटला नाही. त्यांना निसर्गात दिसली ती "कळ्यांचा मुकुट घातलेली सुंदर सृष्टिदेवता." या सृष्टीत जे जे सुंदर होते ते ते त्यांना आपल्याकडे ओढत होते. या सौंदर्यामुळेच "वस्तुवस्तूत काव्य विलसते आहे" असे त्यांना वाटे.

बालकवींना सौंदर्याचा साक्षात्कार होतो तो निसर्गाच्या व्यापक विश्वातच. निसर्गाच्या विविध स्वरूपातील सौंदर्य पाहून त्यात त्यांच्या

त्या-या चित्तवृत्ती तल्लीन होऊन जातात, आणि मग या सौंदर्याच्या अवलोकनाने त्यांना एक दिव्य आणि निरागस आनंद प्राप्त होतो, दिव्य शांतीचा लाभ होतो, "फुले शांतिची अहा उधळली जगती चौफेर" असे त्यांना वाटू लागते. सौंदर्यरसाचे पान करताना पृथ्वीवर जणू काही प्रेमाचा लोंढाच वाहतो आहे असे बालकवींना वाटे, त्यावेळी त्यांना अन्य कोणत्याही गोष्टीची यत्किंचितही जाणीव उरत नाही. त्या प्रेमाच्या लोंढयात ते वाहून जातात. अरुणकाळी पूर्वसमुद्रावर पसरलेल्या रम्य सोनेरी छटेकडे पाहाता पाहाता त्यात ते हरपून जातात, त्यांच्या हृदयस्थ भावनांचा उद्रेक होतो आणि मग त्या विविध कल्पनांत व्यक्त होतात. मोठया उत्कटतेने ते सगळ्यांना गावयास सांगतात,

“ऊठ कोकिळा। भारद्वाजा ! ऊठ गडे, आता,
मंगल गानी टाका मोहुनि जगताच्या चित्ता।
सरिते। गाणे तुझे सुरांमधि या मिळवी बाई!
साध्याभोळ्या तुझ्या गायना खंड मुळी नाही!
पिवळी कुरणे या गाण्याने हर्षोत्कट झाली!
गाऊ लागली, नाचु लागली, वेडावुनि गेली!
चराचराच्या चित्ती भरले दिव्याचे गान!
त्या दिव्याने स्वर्भूमीचे ऐक्य असे केले,
त्या दिव्याने मांगल्याचे पाट सुरू झाले।” (अरुण)

बालकवींना मेघांत, निर्झरात, फुलांत, तारकांत – निसर्गातील वस्तुवस्तूत सौंदर्यच सौंदर्य भरून राहिल्याचे जाणवते. सर्वच निसर्ग सौंदर्याने ओतप्रोत भरलेला आहे असे त्यांना वाटते. शुक्र म्हणजे आकाशातील सौंदर्याचा केंद्रबिंदू. त्याचे मोहक सौंदर्य पाहून कवीचे मन अक्षरश: वेडे होते –

" सौंदर्ये वेडे झाले – तेजाची वारुणि प्याले
दिव्याच्या मागुनि चाले – विश्व खरे कळुनी आले,
केंद्र तया सौंदर्याचा – शुक्र नभी उगवे ताचा.
मुकुट कळ्यांचा दिव्य शिरी – पीतांबर परिधान करी,
तेज विखुरले चोहिकडे – पुष्पावर गगनी उघडे.

चांदणे पडले म्हणजे आकाशात जणू काही तेजाची लयलूट होते आणि "सौंदर्याची वेल" बहरते. हेच दिव्य सौंदर्य कवीला अवखळपणे वाहणाऱ्या निर्झरात दिसते. निर्झर म्हणजे सौंदर्याचे निधानच. माणसाने सृष्टी–तील या दिव्य सौंदर्याचा अभ्यास केला पाहिजे असा बालकवींचा आग्रह आहे. सृष्टीत सौंदर्याचा साक्षात्कार कोठे होईल हे सांगताना "सौंदर्याचा अभ्यास कर ! " या कवितेत ते म्हणतात –

" सूर्याची किरणे, सुनिर्मल तशा त्या तारकामालिका,
संध्येचे रमणीय रंग, उदयी सृष्टी मनोहारिका,
वृक्ष श्यामल पुष्पसंकुल चलद्दूर्वादलाच्छादिता,
वाहे शांतपथा सुरम्य सरिता कल्लोलमालायुता, "

बालकवींची ही सौंदर्यासक्ती प्राय: सर्वच कवितांत आढळते. त्यांतही "अरुण" "निर्झरास", "संध्यारजनी", "फुलराणी", "तारकांचे गाणे", "संध्यातारक ", "श्रावणमास", "बालविहग", "आनंदी पक्षी", "शुक्रोदय", "शारदीय सौंदर्य देवता", "बाळे ती खेळत होती", "सृष्टीच्या गायकास", "जिकडे तिकडे गाणेच गाणे", "मेघांचा कापूस", "दवबिंदू", "पक्ष्यांचे गाणे" या कविता विशेष उल्लेखनीय आहेत. निसर्गातील एक एक वस्तू म्हणजे बालकवींना सौंदर्याचे निधान वाटते. बालकवींचे कविताविश्व अशा सौंदर्याने ओतप्रोत भरलेले आहे. "अरुण" कवितेत

बालकवींची जी सौंदर्यासक्ती व्यक्त झाली आहे ती कुसुमाग्रजांना "सृष्टिसौंदर्याच्या पंढरीतील तुकारामाची सायुज्य भक्ती" वाटते.[१] बालकवींच्या येथे उल्लेखिलेल्या सर्वच कवितांच्या बाबतीत असेच म्हणावे लागेल.

बालकवींची ही सौंदर्यदेवता कोणी शरीरधारी मानवी सौंदर्य--देवता नाही. निसर्गात ठायी ठायी भरलेले सौंदर्यच बालकवी दाखवून देतात. त्यांना निसर्गातील विविध वस्तूंमध्ये स्त्रीचे शरीरसौंदर्य दिसल्याचे कुठेही आढळत नाही. निसर्गवस्तूंवर त्यांनी सचेतनत्वाचा आरोप केलेला असला तरी त्यांच्या ठिकाणी असलेले सौंदर्य पाहून एखाद्या लावण्यवतीच्या अवयवांच्या ठिकाणी विलसणारे उन्मादक सौंदर्य बालकवींना कधीही दिसलेले नाही. डॉ. रा. शं. वाळिंबे लिहितात, "निसर्गाच्या सौंदर्याशिवाय इतर कसलेही सौंदर्य त्यांच्या मनाला भुरळ घालू शकत नाही."[२] केवळ निसर्ग सौंदर्यातच ते तन्मय होत आणि त्यामुळेच त्यांना दिव्य आणि निरागस आनंद प्राप्त होई, त्यांच्या चित्ताला अलौकिक शांती लाभे. या आनंदाचा आणि शांतीचा त्यांच्या कवितांत जागोजाग उल्लेख आलेला आहे.

## सौंदर्यासक्ती : सुमित्रानंदन पंत -

बालकवींच्या प्रमाणेच सुमित्रानंदन पंतांमध्ये देखील सौंदर्याची मोठी आसक्ती दिसते. त्यांचे काव्यसंग्रह उषा, संध्या, चंद्र, चंद्रिका

---

[१] कुसुमाग्रज, फुलराणी, कॉन्टिनेन्टल प्रका. पुणे. १९८६ पृ. १०६.
[२] " " [प्रस्तावना] " " पृ. १७.

छाया, दवबिंदू, तरुवरांचे संगीत, हिमालय, विहग, निर्झर या सुंदर निसर्गवस्तूंनी सजलेले आहेत. सौंदर्यासक्ती हे पंतांचे काव्यवैशिष्टय अनेक हिंदी टीकाकारांनी दाखवून दिलेले आहे. डॉ. किरणकुमारी गुप्ता लिहितात, "इनका सौंदर्यबोध अपूर्व है।" [१] डॉ. देवराज लिहितात, "पंतजी मुख्यत: सौंदर्यके कवि हैं। ------------ पल्लव, पुष्प, शैल, निर्झर, लहरें, खग, भ्रमर, सबमें कविकी अपार ममता है और "पल्लव" और "गुंजन" में हमें रूपरंगोंकी जैसी मनोरम और विस्तृत चित्रावली मिलती है वैसी, छायावादी काव्यमें, अन्यत्र उपलब्ध नहीं है।" [२] स्वत: सुमित्रानंदन पंत सांगतात, "आता कधी कधी मला वाटते की, सौंदर्य म्हणजेच ईश्वर! आणि जर तो सुंदर नसेल तर मला ईश्वराबद्दलचे कोणतेही आकर्षण वाटणार नाही." [३] [मराठी अनुवाद] ते सौंदर्याला जीवनाचे शाश्वत मूल्य मानताना दिसतात. ते म्हणतात, "सौंदर्य! होय, सौंदर्य - याला मी चिरंतन जीवनमूल्य मानतो. मनुष्यत्वाची सर्व मूल्ये या शाश्वत मूल्यांमध्ये समाविष्ट होऊ शकतात, आणि या द्वारा अभिव्यक्ती प्राप्त करू शकतात." [४] ते स्वत:ला "सौंदर्यवादी कवी" असेच म्हणवून घेतात.

बालकवींप्रमाणेच सुमित्रानंदन पंत निसर्गसौंदर्यात तल्लीन होऊन जातात आणि मग ही उत्कट सौंदर्यानुभूती शब्दरूप धारण करते. मधुमासा--च्या सौंदर्याने कवी आनंदित होऊन जातो आणि मग त्याला मातीमध्येही

---

[१] डॉ. किरणकुमारी गुप्ता, हिंदी काव्यमें प्रकृति चित्रण, हिंदी साहित्य संमेलन, प्रयाग, संवत् २०१४ पृ. ४४४

[२] शचीरानी गुर्टू, सुमित्रानंदन पंत, आत्माराम एण्डसन्स, दिल्ली, १९५७ पृ. १६१,

[३] सुमित्रानंदनपंत, पंत ग्रंथावली, भाग ६, राजकमल दिल्ली, १९८० पृ. १८७

[४] " " " " " पृ. १८४.

चैतन्य दिसू लागते -

> "लो जग की डाली डाली पर
> जागी नव जीवन की कलियाँ
> मिट्टी ने जड निद्रा तज कर
> खोली स्वप्निल पलकावलियाँ।" [पल्लविनी]

"वीचिविलास" पाहून कवीला तो स्वर्गीय उल्हास व्यक्त होत आहे असे वाटते. लाटांचा विलास या जगताला दुर्मिळ आहे असे त्याला जाणवते. आपल्या विलासात रंगलेल्या जललहरींशी कवी एकरूप होऊ इच्छितो आहे. तो तिला म्हणतो,

> "अरी सलिल की लोल हिलोर।
> यह कैसा स्वर्गीय हुलास ?
> सरिता की चंचल दृग कोर।
> यह जग को अविदित उल्लास।
> आ, मेरे मृदु अंग झकोर,
> नयनों को निज छबि में बोर,
> मेरे उर में भर यह रोर।"

"हिमप्रदेश" या कवितेत पर्वत प्रदेशातील सौंदर्याचे कवीने रम्य चित्र रेखाटले आहे. या पर्वत प्रदेशात तो तृण-वृक्षांच्या गोष्टी ऐकतो, पक्ष्यांच्या पंखांवर बसून निळ्या छायावनाला ओलांडून जातो, तो फुलांच्या सड्यामध्ये सुखी बनतो आणि कोकिलकूजिताने त्याचे मन वनात भिरभिरू लागते. निसर्गाची शोभा, त्यातील विविध रंग, त्याचे हृदय भारावून टाकतात. कवी सांगतो,

> "प्रकृति गोद में छिप, क्रीडा प्रिय,

तृण तरु की बातें सुनता मन,
विहगों के पंखों पर करता,
पार नीलिमा के छाया वन।
रंगों के छींटों से नवदल
गिरि क्षितिजों को रखते चित्रित,
नव मधु की फूलों की देही
  मुझे गोद भरती सुख विस्मृत।
कोयल आ गाती, मेरा मन
जाने कब उड जाता वन में,
षड्ऋतुओं की सुषमा अपलक
तिरती रहती उर दर्पण में।"

पंतांना "बादल" मृगाप्रमाणे उडया मारत आहेत, त्यांचा जमिनीवर पाय टेकत नाही असे कधी वाटते, कधी ते मत्त हत्तीप्रमाणे डुलत चालले आहेत असे भासते, तर कधी भित्र्या सश्याप्रमाणे आकाशात विचरण करताहेत असे जाणवते. प-यांच्या मुलांप्रमाणे ते आपले सुंदर शिंपल्यासारखे पंख पसरवून चंद्राचे सुकुमार हात धरून चांदण्यात मोठया आनंदाने तरंगत आहेत अशीही तो कल्पना करतो. "रूप, रंग, रज, सुरभी, मधुर मधु" आपल्या "मुकुलित अंगा"मध्ये भरभरून "वसंतश्री" त्यांना आकर्षित करते. "शुभ्र निर्झर के झर झर पात।" त्यांच्या मनाला मोडून टाकतात. "निर्झर गान" कवितेत आपले हे कुतूहल व्यक्त करीत ते विचारतात,

"शुभ्र निर्झर के झर झर पात।
  कहाँ पाया वह स्वर्गिक गान?
    श्रृंग के निर्मल नाद।
      स्वरों का यह संधान?"

मुग्ध स्वर्ण किरणें, निळे आकाश आणि विव्हल लाटा त्यांच्या डोळयांत

प्रफुल्लता, नीलिमा आणि चंचलता निर्माण करतात -

"मुग्ध स्वर्ण किरणें प्रात
प्रथम खिलाये वे जल जात
नील व्योम ने ढल अज्ञात
उन्हें नीलिमा दी नव-जात
आकुल लहरों ने तत्काल
उनमें चंचलता दी डाल।" [गुंजन]

सुमित्रानंदन पंत यांच्या कवितेत सौंदर्य असे सर्वत्र विखुरलेले आढळते.

## बालकवी आणि सुमित्रानंदन पंत यांच्या सौंदर्यासक्तीतील फरक :

बालकवी आणि सुमित्रानंदन पंत दोघेही सौंदर्याचे पुजारी असले तरी दोघांच्या या सौंदर्यासक्तीत स्पष्ट असा फरक दिसून येतो. बालकवींना निसर्गवस्तूंमध्ये नारीसौंदर्य दिसल्याचे कुठेही आढळत नाही. त्यांना केवळ निसर्गाचेच सौंदर्य मोहित करते. निसर्गसौंदर्यात तन्मय झाल्यामुळे त्यांना लावण्यवतीच्या उन्मादक सौंदर्याची आठवणही होत नाही. याउलट सुमित्रानंदन पंतांच्या सौंदर्यासक्तीत नारीसौंदर्याचा मोह स्पष्टपणे आढळतो. "नौकाविहार" कवितेमध्ये सैकत शय्येवर झोपलेल्या दुग्ध-धवल तन्वंगी गंगेचे ते वर्णन करतात. "मस्त मधुर" मुरलीचा ध्वनी ऐकून जल लहरी एकत्रित येऊन उल्हासाने नाचू लागतात आणि मग त्यांचा पदर खाली ढळतो. त्यांची "संध्या" तरुणीचे लावण्य आणि हावभाव घेऊनच आपल्यापुढे येते -

"कौन, तुम रूपसि कौन
ग्रीव तिर्यक, चंपक द्युतिगात

नयन मुकुलित, नत मुख जल जात,
देह छवि छाया में दिन रात
कहाँ रहतीं तुम कौन। "          [पल्लविनी]

सुमित्रानंदन पंतांना निसर्गात तारुण्यसुलभ आलिंगन चुंबनाची दृश्ये बरीच दिसतात. मांसल ऐन्द्रियतेचे त्यांच्या कवितेतील एक दृश्य असे,

"वसुधा के उरोज शिखरों से खिसका चल मलयांचल,
सरिता की जांघों से सरका लहरा रेशम-सा जल। "[स्वर्णकिरण, पृ. ५१]

डॉ. रामविलास शर्मा लिहितात, "कविको प्रकृति में बारम्बार नारी रूप की कल्पना करके मन का दीपन शान्त करना पडता है। "[१]

बालकवी आणि सुमित्रानंदन पंत यांच्या सौंदर्यासक्तीमधीलें आणखी एक मोठा फरक असा की बालकवींना जे काही सौंदर्य आढळते ते निसर्गातच. निसर्ग हाच त्यांच्या सौंदर्याचे एकमेव ठिकाण, परंतु सुमित्रानंदन पंत निसर्गसौंदर्याकडून नारीसौंदर्याकडे आणि नारीसौंदर्या--कडून मानवी सौंदर्याकडे वळतात, आणि पुन्हा आध्यात्मिक सौंदर्याच्या क्षेत्रातही वावरतात. त्यादृष्टीने विचार करता त्यांच्या कवितेत किशोरावस्था, यौवनावस्था आणि प्रौढावस्था असा क्रमिक विकास दिसून येतो. या वयोवस्थेच्या विकासाच्या अनुषंगानेच त्यांच्या निसर्गविषयक दृष्टीमध्ये फरक पडत गेलेला दिसून येतो. प्रारंभी निसर्गसौंदर्यात रममाण होणारा कवी "ग्राम्या" काळामध्ये म्हणू लागतो,

"जग विकास क्रम में सुंदरता सबकी हुई पराजित,
तितली, पक्षी, पुष्प, वर्ग इसके प्रमाण हैं जीवित।
हृदय नहीं इस सुंदरता के भावोन्मेष न मन में,
अंगों का उल्हास न चिर रहता, कुम्हलाता क्षण में।"  [ग्राम्या]

---

[१] शचीरानी गुर्टू, सुमित्रानंदन पंत, आत्माराम एण्डसन्स, दिल्ली १९५७ पृ. २९४.

आता कवीला निसर्गापेक्षा मानव अधिक सुंदर दिसू लागतो -

" सुंदर है विहग, सुमन सुंदर
मानव! तुम सब से सुंदरतम
निर्मित सब की तिल सुषमा में
तुम निखिल सृष्टि में चिर निरुपम " [गुंजन]

तसे पाहिले तर निसर्गसौंदर्याचे त्यांचे आकर्षण पुढील काळातही सर्वस्वी सुटले होते असे नाही, परंतु निसर्गापेक्षा मानवसौंदर्याचे त्यांना अधिक वेध लागले होते हे नाकारता येत नाही. स्वत: पंत "पर्यालोचन" या लेखात सांगतात, "माझी निसर्गानुरागाची भावना क्रमश: सौंदर्यप्रधानते-पासून भावप्रधान आणि भावप्रधानते-पासून ज्ञानप्रधान होत गेली आहे." [१] या बदलत्या वृत्तीमुळे पंत निसर्गसौंदर्याकडून नारीसौंदर्याकडे आणि नारीसौंदर्याकडून मानवसौंदर्याकडे वळतात, मानवसौंदर्यावरून निसर्ग--सौंदर्य ओवाळून टाकतात. माणसाला ते म्हणतात,

" न्योछावर तुम पर निखिल प्रकृति,
छाया प्रकाश के रूप- रंग। " [ मानव, युगपथ पृ. ५०]

तथापि वर्ण्य-विषय बदलला तरी पंतांच्या सौंदर्यासक्तीमध्ये कुठेच क्षीणता आलेली नाही. निसर्ग, नारी आणि मनुष्य यांच्या सौंदर्या--प्रमाणे आत्मसौंदर्याचे भानही त्यांच्या कवितेला आहे. डॉ. नगेंद्र सौंदर्य हाच पंतांच्या कवितेचा खरा विषय आहे, असे सांगतात. ते लिहितात, " सौंदर्य - प्राकृतिक, मानसिक और आत्मिक ही इनकी कविता का असली विषय है।" [२] बालकवींच्या कवितेत मात्र केवळ निसर्ग-सौंदर्यच आढळते. ते आरपार निसर्गसौंदर्याचेच भक्त असल्याचे

---

[१] सुमित्रानंदन पंत, पर्यालोचन, पंत ग्रंथावली भाग ६, राजकमल दिल्ली, १९८० पृ. २६७

[२] डॉ. नगेंद्र, सुमित्रानंदन पंत, साहित्यरत्न भण्डार, आगरा, ११ संस्करण, १९६६ पृ. १९.

आढळते.

सौंदर्यासक्तीवरील आक्षेप -

प्राय: कवींना निसर्गाच्या रम्य, कोमल आणि सुंदर रूपाचे आकर्षण असते. बालकवी आणि पंत या दोघांचा निसर्ग रम्य स्वरूपाचाच आहे. निसर्गातील सुंदरतेचेच या दोघांना वेड आहे. या दोघांनीही रौद्र, भीषण किंवा असुंदर अशा निसर्गाचे चित्रण केलेलेच नाही असे नाही. बालकवींच्या "यमाचे दूत" आणि "खेड्यातील रात्र" या कवितांत असुंदर, काहीसा भीषण निसर्गाचे चित्रण आहे. सुमित्रानंदन पंतांनी मेघांचे रौद्र स्वरूप असे दाखवून दिले आहे -

"विलोडित सघन गगन में आज
विचर रहा है दुर्बल घन भी
धर कर भीमाकार
बना है कहीं क्रुध्द गजराज।" [वीणा]

"ग्राम्या" संग्रहात पंत निसर्गाचे शोभन आणि स्वप्निल स्वरूप सोडून अशोभनाच्या आणि असुंदराच्या यथातथ्य चित्रणात काहीसे उतरलेले दिसतात, तथापि भीषणाकडे, असुंदराकडे त्यांचा कल मुळीच नाही असे म्हणणेच योग्य होईल. रम्य, मृदू, कोमल, सौंदर्याचेच चित्रण त्यांच्या कवितांत आढळते. बालकवी आणि पंत यांच्या रम्य आणि सुंदराकडील या आकर्षणाबद्दल काहींनी आक्षेप घेतलेला आहे. डॉ. रा. शं. वाळिंबे बालकवींच्या निसर्गाबद्दल म्हणतात, " निसर्गाचे केवळ रम्य रूपच त्यांना दिसले ......... त्यांचा निसर्ग छोट्याशा कुरणात सामावलेला आहे." [१]

---

[१] श्री. अ. ना. देशपांडे, आधुनिक मराठी वाङ:मयाचा इतिहास भाग १, खंड २, व्हीनस प्रका. पुणे, प्र. आ., १९७४ पृ. ३३०.

प्रा. भा. ल. पाटणकर तक्रार करतात, " बालकवींच्या काव्यात दाट अरण्ये, कीर्र झाडी, खोल दरी, उंच डोंगर, पावसाळ्यातील धो धो वाहणारी नदी, चवथीचा चांद वगैरे दृश्याचे वर्णन नाही." [१] प्रा. श्री. म. माटे यांनी बालकवींच्या "विकलांग निरीक्षणाचा", "विकलांग रूचीचा" आणि निसर्गातील "एव्हढयाशाच पुंजी"चा निर्देश केलेला आहे. [२] बालकवींचा निसर्ग छोटयाशा कुरणात सामावलेला होता अशी ही तक्रार आहे. पंतांच्या निसर्गाच्या बाबतीतही अशाच तक्रारी करण्यात आलेल्या आहेत. डॉ. नगेंद्र लिहितात, " प्रकृति के विराट रंग-मंच पर इनकी सौंदर्यमयी दृष्टि पल्लव, वीचि-जाल, मधुप कुमारी, किरण, चाँदनी, अप्सरा, ज्योत्स्ना, छाया, इन्दु, सुरभि, तारिकाएँ आदि पात्रों का ही अभिनय देखती है - अथवा देखना चाहती है। दिगन्तव्यापी उल्कापात, बवण्डर, भूकम्प और बाडव-मंथन आदिमें इनकी वृत्ति नहीं रमती।" [३] आ. रामचंद्र शुक्लांनी अशात-हेचे केवळ कोमल, रम्य, निसर्गाचे चित्रण करणा-या कवींना तमासगीराच्या वर्गात ढकलले आहे, तथापि आपण पहिल्या प्रकरणात यासंबंधी व्यक्त केलेला विचार लक्षात घेतला तर, या तक्रारीत फारसा अर्थ नसल्याचे लक्षात येईल. कवी निसर्ग सुंदर असल्यामुळेच त्याच्या सान्निध्यात जातात. सौंदर्यप्रीती हेच मानवी निसर्ग प्रीतीचे खरे कारण आहे, त्यामुळे या कवींनी निसर्गातील सुंदराचेच वर्णन केले, तर त्याबद्दल त्यांना दोष देणे बरोबर नाही. बालकवींना निसर्गात सारीकडे सुंदरच सुंदर भरून राहिल्याचे वाटते, आणि सुमित्रानंदन पंत म्हणतात,

---

[१] भा. ल. पाटणकर, बालकवींची समग्र कविता, रामकृष्ण बुक डेपो, मुंबई४ १९४२, पृ. ५५

[२] गो. गो. अधिकारी, बालकवींची कविता[प्रस्तावना] सारस्वत प्रसारक मंडळी, १९२५.

[३] शचीरानी गुर्टू, सुमित्रानंदन पंत, आत्माराम एण्डसन्स, दिल्ली, १९५७ पृ. १०४

"मैं सुंदरता में स्नान कर सकूँ प्रतिक्षण."

श्री. शिवचंद्र नागर सांगतात, " पंत जी सौंदर्य में ही जीवित रहते हैं। वे सौंदर्य-द्रष्टा भी हैं और सौंदर्य-स्त्रष्टा भी। उनके प्राणों में सौंदर्य का अगाध सागर लहरें मारता है।" [१] शिवाय केशवसुतांनी सांगितल्या-प्रमाणे कवींच्या करस्पर्शाने कुठलीही वस्तू सौंदर्यातिशयाने निथळून उठते हेही लक्षात घेतले पाहिजे. सुमित्रानंदन पंत खिडकीतून पौर्णिमेच्या प्रथम प्रहरी निसर्गातील दृश्य पाहात आहेत. क्षितिजापर्यंत आम्रवन झोपलेले आहे. आकाशातील ग्रह-नक्षत्रे आणि तारका यांची शोभा मनाला मुग्ध करीत आहे. अशावेळी कवीची दृष्टी केवळ सुंदराकडेच वळते. कवीला अनुभव येतो,

" आज असुंदरता, कुरूपता भव से ओझल,
सब कुछ सुंदर-ही-सुंदर, उज्ज्वल-ही-उज्ज्वल। " [खिडकीसे]

अशा अनुभवात काहीही चुकीचे नाही. निसर्गकवींना सुंदराचेच आकर्षण असल्याचे सर्वत्र दिसते. साहित्यशास्त्रज्ञांनी सौंदर्यभावनेला निसर्गरसाचा स्थायिभाव मानून हेच मर्म नेमके सांगितले आहे.

[५] तत्त्वजिज्ञासेची वृत्ती : बालकवी

बालकवींच्या कवितेत तत्त्वजिज्ञासेचीवृत्ती फारशी आढळत नाही. धर्म, ईश्वर, नीती इत्यादी कल्पनांविषयी त्यांच्या मनात अनेक प्रकारच्या शंकाच दिसून येतात. "कवीची इच्छा" या कवितेत या

---

[१] शचीरानी गुर्टू, सुमित्रानंदन पंत, आत्माराम एण्डसन्स, दिल्ली, १९५७ पृ. १५

संशयमालिकेने त्यांचे मन अक्षरशः संभ्रांत झालेले दिसते. धर्मविषयी सुध्दा त्यांच्या मनात एक कलह माजलेला दिसतो. "हृदयाची गुंतागुंत" या कवितेत त्यांचे मन व बुध्दी यांमध्ये मोठा कलह चाललेला दिसतो. "हृदयाची गुंतागुंत" या कवितेत ते म्हणतात,

" हे धर्म सांगती भिन्न भिन्न पथ काही
मम वृत्ति सांगती भिन्न तुझा पथ पाही.
ही बुध्दि सांगता मन ऐके ना तीते
हे चित्त वदे ते पटेच ना बुध्दीते
द्वैताची असली अक्षय झोंबी चाले. "

बालकवींना ज्ञान हे व्यर्थ असल्याचे वाटते. त्यांना प्रत्यक्ष ज्ञानच अज्ञान आहे असे वाटते. ज्ञानाने प्रश्न सुटण्याऐवजी उलट त्याच्या फासातच मन अडकते अशी ते तक्रार करतात. "आवाहन" या कवितेत, "सौख्यहि शिणले, दुःखहि शिणले, शिणले तत्त्व विचार" असा उद्विग्न मनाचा त्यांचा उद्गार आढळतो. बालकवींचा तत्त्वज्ञान मनाला समाधान प्राप्त करून देईल या गोष्टीवर मुळी विश्वासच नाही.

बालकवींना तत्त्वज्ञानाबद्दल मुळीच कुतूहल नाही असे नाही. ते "दीपशिखे"स म्हणतात,

" जड मूढा येऊ देई। याहि, तुझ्या संगे ताई।
परम धाम हृदयाचे ते। दाखव, गे दाखव माते. "

ते "सृष्टीच्या गायकास" ही सृष्टीची, निगूढतेची तत्त्वे उकलून सांगण्याची प्रार्थना करतात, तथापि ज्ञानाचे वैयर्थ्य त्यांना जाणवत राहते आणि मग तत्त्वजिज्ञासेचे हे कुतूहल दबले जाते. आपले मन जडतेला खिळून

राहिल्याची व्यथा त्यांनी ब-याच ठिकाणी व्यक्त केली आहे -

" जडतेला खिळूनी राही हृदयबंध उकलत नाही ।
दिव्यरसी विरणे जीव जीवित हे याचे नाव
ते जीवित न मिळे माते मग कुठुनी असली गीते ? [निर्झरास]
जीव ओढतो वर वर जाया चैतन्यापाठी
हाय! सुटेना दृढ देहाची परि बसली गाठी । [बालविहग]

बालकवींच्या कवितेत तत्त्वज्ञानाच्या व्यर्थतेचाच विचार आल्यामुळे त्यांच्या निसर्गकवितेत तत्त्वजिज्ञासेला स्थानच राहात नाही.

## तत्त्वजिज्ञासेची वृत्ती : सुमित्रानंदन पंत

तत्त्वजिज्ञासेच्या बाबतीत बालकवींच्या नेमकी उलटी स्थिती सुमित्रानंदन पंतांच्या कवितेत आढळते. निसर्ग आणि सौंदर्य यांचा उपासक हा कवी आरंभापासूनच चिंतनशील दिसतो. त्याचा ईश्वराच्या अस्तित्वावर पूर्ण विश्वास आहे. "ईश्वर पर चिर विश्वास मुझे।" असे हा कवी ठामपणे सांगतो. लहानवयातच रामकृष्ण परमहंस, विवेकानंद, रविबाबू यांच्या तात्त्विक विचारांचा या कवीवर प्रभाव पडलेला होता. त्या प्रभावामुळेही पंत अध्यात्माकडे झुकलेले दिसतात. ईश्वर आहे, त्याच्यावर विश्वास करण्याने आम्हांला सामर्थ्य प्राप्त होते आणि त्याच्याशी आपल्याला भावसंबंध स्थापित करता येतो अशी त्यांची श्रध्दा होती. निसर्गाकडे पाहाता पाहाता त्यांना अंतिम शक्तीचे रहस्य सापडते आणि सा-या जगातला ऐक्य भाव जाणवतो -

[१] " निभृत स्पर्श पाकर निसर्ग का
आत्मा गोपन करती चिन्तन। "

[२] " एक ही तो असीम उल्लास,
विश्व में पाता विविध-भास,
तरल जलनिधि में हरित विलास,
शान्त अम्बर में नील विकास। "

सुमित्रानंदन पंतांच्या निसर्गकवितांत त्या ईश्वरीशक्तीचे सूत्र व्याप्त असल्याचा भाव अनेक ठिकाणी दिसतो. प्रथम रश्मीच्या आगमनाने विहगबाला कलरव करु लागते आणि प्रसूनात मृदू हास्य झळकते. ते पाहून कवीला निसर्गामध्ये व्याप्त असलेल्या चेतनशक्तीचा आभास होतो आणि मग त्या अंतिम शक्तीविषयी त्याच्या मनात अनेक प्रश्न उभे राहातात. तो निसर्गाला विचारतो,

"मा! यह तेरी न्यारी रीति
तेरी सुखमय सत्ता जग को,
कहाँ नहीं जतलाती है ?" [वीणा]

समस्त निसर्ग त्या अंतिम शक्तीने परिचालित आहे असा त्याचा विश्वास वाढत राहातो. कवीच्या या तत्त्वजिज्ञासेच्या दृष्टीने "मौन निमंत्रण" ही कविता अतिशय महत्त्वाची आहे. कवीला सर्व निसर्गात ईश्वराचे अस्तित्व जाणवू लागते. तो प्रश्न करु लागतो,

" देख वसुधा का यौवन भार
गूँज उठता है जब मधुमास,
विधुर उर के-से मृदु उद्गार
कुसुम जब खुल पडते सोच्छ्वास,
न जाने सौरभ के मिस कौन
संदेशा मुझे भेजता मौन। "

"वसंत-श्री"चे रूप-वैभव आणि मधुमय क्रीडांनी कवीची जिज्ञासावृत्ती जागी होते आणि तो प्रकृती मातेला अनेक प्रश्न विचारू लागतो -

" उस फैली हरियाली में, कौन अकेली खेल रही माँ।
वह अपनी वय-बाली में ? सजा हृदय की थाली में
क्रीडा, कौतूहल, कोमलता, मोद, मधुरिमा, हास, विलास,
लीला, विस्मय, अस्फुटता, भय, स्नेह, पुलक, सुख, सरल हुलास
उषा की मृदु लाली में ----"

उषेचे मृदू हास्य, कुसुमांचे मंद स्मित, रजनीची नीरव निद्रा, पक्ष्यांचे कलगान आणि निर्झरिणीचा कल-कल निनाद - या सा-यात त्या ईश्वरी कोमलतेचे आणि पवित्रतेचे दर्शन कवीला होते. समस्तसृष्टी एका सूत्रात गुंफली गेली आहे, एकच सत्ता सा-यांना व्यापून राहिलेली आहे, अशी या कवीची ठाम धारणा आहे -

एक छबि के असंख्य उडगन
एक ही सब में स्पन्दन।                    [पल्लविनी]

बालकवी आणि सुमित्रानंदन या दोन कवींची तत्त्वजिज्ञासेच्या वृत्तीच्या दृष्टीने तुलना करता या दोन कवींमध्ये मोठे अंतर स्पष्टपणे दिसून येते. बालकवी संशयमालिकेने ग्रस्त दिसतात, तर सुमित्रानंदन पंतांचा ईश्वरी शक्तीवर ठाम विश्वास दिसतो. त्यांच्या या दृष्टिभेदामुळे त्यांच्या निसर्गचित्रणातही फरक पडत गेलेला आहे. बालकवींना सुख, समाधान, आनंद, शांती, दिव्य जे काही आढळते ते केवळ निसर्गसौंदर्यातच. निसर्गसौंदर्य हेच त्यादृष्टीने त्यांचे अंतिम तत्त्व असते. सुमित्रानंदन पंतांना निसर्गाहून वेगळ्या, पण निसर्गासह सा-या जगतात भरून राहिलेल्या अशा ईश्वराच्या अस्तित्वाची जाण आहे, त्यामुळे निसर्गातच केवळ नव्हे, तर

निसर्गाच्या बाहेरही सर्वत्र त्यांना ईश्वरीशक्तीचे अधिष्ठान आढळून येते.

[६] आशानिराशेची वृत्ती : बालकवींची निराशवृत्ती

बालकवींच्या कवितेत उदासीनतेचा एक आर्त स्वर जागोजाग आढळतो. डॉ. रा. शं. वाळिंबे लिहितात, " वर्तमानात काही समाधान नाही आणि भविष्याविषयी कसलाच आशावाद नाही अशी बालकवींच्या मनाची स्थिती आहे. [१] " आपण दु:खाने भरलेल्या जगात नांदत आहोत, ही बालकवींची सततची जाणीव आहे. मानवीजीवन अनेक उणिवांनी भरलेले असून ते कधीच परिपूर्ण होऊ शकणार नाही हे शल्य त्यांच्या हृदयात रुतून बसलेले दिसते. त्यामुळे त्यांच्या मनाला विषण्णता जाळीत असलेली आढळते. मानवी जग पराकाष्ठेचे स्वार्थी आहे, दुष्ट आहे असा भाव ब-याच ठिकाणी त्यांनी व्यक्त केला आहे.

१. कठिणच गे नरजाति खरी - फुलपाखरु-फुलवेली.

२. त्या बाल्याच्या सीमेवरते
दुष्ट मत्सरी जगतापरते
प्रेमाचे साम्राज्य सभोते
बनवोनी राहू - सुकलेली फुले.

३. मोहाचे वीरव विखारी । बेभान करी सकलाते
वा-यावर भेसुर भारी । अंधुकता पसरित ये ते । -बाळे ती खेळत होती.

४. हे जग अवघे अवघे खोटे
नित्य चालले हे उफराटे - काय असे संसारात ?

---

[१] डॉ. रा. शं. वाळिंबे, फुलराणी, प्रस्तावना, कॉन्टिनेन्टल प्रका, पुणे१९८६ पा. नं. ३

मानवी जगाविषयीच्या या कटू अनुभवामुळे कवी उदास होतो. "स्वार्थाच्या बाजारात, किती पामरे रडतात" असे बालकवी "आनंदी-आनंद" या कवितेत म्हणत आहेत. जगाची ही वृत्ती पाहून बालकवी खिन्न, उदासीन होतात. हा खिन्नपणा आपल्या निराश हृदयाला क्षणभरही सोडीत नाही असे त्यांनी पुन:पुन्हा केविलवाणेपणाने म्हटले आहे. "निराशा" या कवितेत बालकवी सांगतात,

" सुंदर सगळे, मोहक सगळे
खिन्नपणा परि मनिचा न गळे
नुसती हुरहुर होय जिवाला - का न कळे काही।

जगातील अनंत दु:खे, क्षुद्र स्वार्थ, तिरस्करणीय संकुचितपणा, आपल्या आकांक्षांचा प्रत्ययी होणारा चुराडा, सर्व गोष्टींची क्षणभंगुरता ही कारणे बालकवींच्या औदासीन्याच्या मुळाशी आहेत. आपल्या या उदासीनतेचे विशद चित्र त्यांनी "उदासीनता" या कवितेत रेखाटले आहे. "रजनीस आवाहन" या कवितेतही कवीने अनेक आर्त विचार व्यक्त केले आहेत. ते विचार म्हणजे कवीच्या नैराश्यपूर्ण जीवनाचे भाष्यच होय. ही नैराश्याची भावना मग पराकाष्ठेला पोचते आणि कवी कारुण्यपूर्ण शब्दात मृत्यूचे " ये काळा, ध्यान तुझे मात्र मला लागले ! " असे आवाहन करु लागतो. बालकवींची ही निराशावृत्ती त्यांच्या कवितेत अगदी स्पष्टपणे व्यक्त होते.

## आशावादी सुमित्रानंदन पंत

बालकवी निराशावादी, तर सुमित्रानंदन पंत आशावादी. पंतांचे हे आशावादाचे वैशिष्ट्य स्पष्ट करीत "पंत का "मानववाद" " या लेखात श्री. दि. के. बेडेकर लिहितात, " बालकवि में जो एक उदास छाया

कभी-कभी हमें नजर आती है, उसका पंतजी की रचनाओं में स्थान नहीं, यही उनकी विशेषता है।"[१] बालकवींच्या कवितेत आशावाद मुळीच येत नाही किंवा पंतांच्या कवितेत निराशा यत्किंचितही आढळत नाही असे नाही. सुमित्रानंदन पंतांनीही,

" वहीं कहीं, जी करता, मैं जाकर छिप जाऊँ,
मानव-जग के क्रन्दन से छुटकारा पाऊँ।
प्रकृति-नीड में व्योम खगों के गाने गाऊँ,
अपने चिर स्नेहातुर उरकी व्यथा भुलाऊँ।" - "दिवास्वप्न

अशी आपली निराशा व्यक्त केली आहे आणि बालकवींनीही, "येईल एक परि धन्य दिवस सौख्याचा, जो करिल तुझ्यासह अंत तुझ्या गीताचा" असा आशावादी सूर काढला आहे, पण असे अपवादानेच आढळते. बालकवींचा प्रधान स्वर गहन, घोर निराशेचा, तर पंतांचा प्रधान स्वर प्रफुल्लित आशावादाने भरलेला आहे. बालकवींना जगात स्वार्थ आणि दुष्टावा दिसतो, याउलट सुमित्रानंदन पंतांना जगजीवन अतिशय सुंदर वाटते-

"सुंदर से नित सुंदरतर,
सुंदरतर से सुंदरतम,
सुंदर जीवन का क्रम रे
सुंदर सुंदर जग जीवन।"

अन्यत्र एके ठिकाणी ते म्हणतात,

"जग-जीवन में उल्लास मुझे,
नव-आशा नव-अभिलाष मुझे,
ईश्वर पर चिर विश्वास मुझे,"

---

[१] शचीरानी गुर्टू, आत्माराम एण्डसन्स, दिल्ली, १९५७, पृ. २४६

निष्कर्ष -

कवीवृत्तींचा विचार करता बालकवी आणि सुमित्रानंदन पंत या दोघांत काही समानवृत्ती आढळतात. या समानवृत्तीतही थोडा--फार भेद दिसतो, इतकेच नव्हे तर बालकवींत न आढळणा-या काही वृत्ती सुमित्रानंदन पंतांमध्ये दिसतात.

[१] बालसुलभवृत्ती ही सुमित्रानंदन पंत व बालकवी यांच्यात समान अशी दिसते. पण बालकवी अखेरपर्यंत बालसुलभवृत्तीनेच निसर्गकविता लिहीत राहिले. सुमित्रानंदन पंतांच्या प्रारंभीच्या निसर्गकवितांत बालसुलभवृत्ती आढळली तरी ती उत्तरकालीन कवितांत आढळत नाही. त्यांच्या निसर्गकवितांत किशोरावस्था, युवावस्था आणि प्रौढावस्था असा क्रमिक विकास दिसतो.

[२] बालकवींमध्ये स्वप्नाळूपणाची वृत्ती आधिक्याने दिसते. पंतांच्या कवितेत काही ठिकाणी स्वप्नमय जगत व्यक्त झाले असले तरी, ते वास्तवजगाला विसरू शकत नाहीत. बालकवींच्या कवितेत भावपक्ष प्रबल, तर पंतांच्या कवितेत विभावपक्ष प्रबल, त्यामुळे पंतांच्या कवितेत निसर्गाची यथातथ्य चित्रे अधिक येतात.

[३] मानवीकरणाची प्रबल प्रवृत्ती बालकवी आणि पंत दोघांतही आढळून येते, पण दोघांच्या मानवीकरणात थोडा फरक आढळतो. बालकवींच्या मानवीकरणात मानवीघटनांचा आरोप असतो, तसा पंतांच्या कवितांत फारसा दिसत नाही. निसर्गावर मानवी भावभावनांचा आरोप दोघांनीही केला आहे, तथापि बालकवी मांसल नारीरूपाचा निसर्गावर आरोप करीत नाहीत. पंतांच्या मानवीकरणात मात्र

स्त्री-रूपाची अनेक मांसल, ऐन्द्रिय चित्रे आढळतात. सुमित्रानंदन पंतांचा निसर्ग मानवाच्या दु:खाने दु:खी झालेला दिसतो. बालकवींच्या निसर्ग--चित्रणात असे चित्र येत नाही.

[४] बालकवींना सौंदर्य आढळते ते केवळ निसर्गातच. निसर्गातील वस्तूंतच त्यांना सौंदर्याचा साक्षात्कार होतो. सुमित्रानंदन पंतांची सौंदर्यलोलुपवृत्ती फक्त निसर्गसौंदर्यापुरतीच मर्यादित राहात नाही. निसर्गसौंदर्याप्रमाणेच त्यांना स्त्री-सौंदर्य आणि मनुष्यसौंदर्यही लुब्ध करते. त्यांच्या सौंदर्यबोधामध्ये एक विकास आणि व्यापकता आढळते.

बालकवी आणि सुमित्रानंदन पंत दोघांच्या कवितेत निसर्गाच्या रम्य, मृदू आणि कोमल रूपाचेच दर्शन होते. अशोभन, असुंदर, भीषण, रौद्र, अशी निसर्गरूपे अभावानेच त्यांच्या कवितेत येतात. याबद्दल या दोन्ही कवींना काही समीक्षकांनी बोल लावलेला आहे, तथापि केवळ सुंदर, रम्य निसर्गचित्रणाबद्दल या कवींना दोष देणे योग्य होणार नाही.

[५] बालकवींमध्ये तत्त्वजिज्ञासेची वृत्ती फारशी आढळत नाही, याउलट निसर्ग आणि सौंदर्य यांचे उपासक असलेले सुमित्रानंदन पंत आरंभा--पासूनच चिंतनशील दिसतात. ईश्वराच्या अस्तित्वावर त्यांचा पूर्ण विश्वास आहे. त्यांच्या आध्यात्मिक दृष्टीचा त्यांच्या एकूण काव्यावर परिणाम झालेला दिसतो.

[६] बालकवींच्या काव्यात गहन, घोर निराशेचा स्वर आढळतो, त्यांना सुख, समाधान, शांती, दिव्य जे आढळते ते फक्त निसर्गातच. मनुष्य जीवनात त्यांना स्वार्थ, संकुचितपणा, दुष्टावा इत्यादी दोष आढळतात. या जगताच्या संबंधाने ते अत्यंत निराशावादी दिसतात, याउलट जगाच्या संबंधाच्या दृष्टीने सुमित्रानंदन पंत मोठे आशावादी आढळतात.

=0=0=0=0=0=0=0=0=